गुरुवार, ३ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक -९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • THURSDAY 03 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-9 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


# नितीन देसाईंची आयुष्याच्या सेटवरुन एक्झिट

आधुनिक केसरी न्यूज

**कर्जत : सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यांच्या कर्जत येथील एन. डी. स्टुडिओमध्येच त्यांनी आत्महत्या केली. देसाई यांच्या आत्महत्येमुळे कला, राजकीय, सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नितीन देसाई यांनी गाजलेल्या चित्रपटांसाठी भव्य-दिव्य सेट उभारले होते. दिग्गज दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले होते. असे असताना त्यांच्यावर मृत्यूपूर्वी तब्बल २४९ कोटींचे कर्ज होते, अशी माहिती आता समोर आली आहे.**

नितीन देसाई यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून आपले प्रशिक्षण पूर्ण केले होते. १९८७ सालापासून त्यांनी चित्रपटांसाठी कला दिग्दर्शनाचे काम सुरू केले. २००५ साली त्यांनी कर्जतमध्ये त्यांचा एन. डी. स्टुडिओ उभा केला. याच स्टुडिओमध्ये त्यांनी आत्महत्या केल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

नितीन देसाई यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मराठी, हिंदी चित्रपटांसाठी कला दिग्दर्शनाचे काम केले. यामध्ये जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, माचिस, देवदास, लगान, प्रेम रतन धन पायो अशा अनेक हिट चित्रपटांचा समावेश आहे. यासारख्या अनेक चित्रपटांसाठी नितीन देसाईंनी 'लार्जर दॅन लाईफ' असे चित्र उभे करण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. अनेक ऐतिहासिक मालिका व




महानाट्यांसाठीही नितीन देसाई यांनी उभारलेले सेट प्रचंड चर्चेचा विषय ठरले होते. दरम्यान, नितीन देसाई यांना त्यांच्या उत्तुंग कारकिर्दीमध्ये चार वेळा सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्याशिवाय, त्यांना फिल्म फेअर पुरस्कारानंही सन्मानित करण्यात आले आहे.



ज्येष्ठ कला दिगदर्शक आणि माझे स्नेही नितीन देसाई ह्यांच्या आत्महत्येच्या बातमीने मन सुन्न झाले. जवळपास ३० वर्ष हिंदी चित्रपटांच्या जगात एका मराठी कलाकाराने जी भव्यता आणि नजाकत उभी केली त्याला तोड नाही. कला दिग्दर्शकाच्या दृष्टीचा पैस हा मोठाच असावा लागतो आणि असा पैस असलेला माणूस आयुष्यात एका क्षणाला कमकुवत होतो, त्याला आयुष्यात पुढे काहीच दिसेनासे आणि तो इतका टोकाचा निर्णय घेऊ शकतो, हे अनाकलनीय आहे. नितीन हा धीराचा माणूस होता, कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाणारा माणूस होता, त्यामुळे त्याने असा आत्मघातकी विचार का केला असेल ? त्याच्यावर ही वेळ कशामुळे आली असेल ह्याचा छडा लागला पाहिजे. असो, कोणावरही अशी वेळ येऊ नये हीच इच्छा. नितीन देसाईंना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची श्रद्धांजली.



नितीन देसाई यांच्या निधनानंतर सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. मुनगंटीवार म्हणाले, अतिशय सुंदर कलाकृती निर्माण करणाऱ्यांपैकी एक म्हणजे नितीन देसाई. महाराष्ट्राचा गौरव वाढेल, अशा पद्धतीने त्यांनी एकेक सेट उभा केला आहे. प्रचंड आविष्कार करण्याची क्षमता त्यांच्यात होती. त्यांची कल्पनाशक्ती अतिशय उत्तम होती. अनेक बैठकांमध्ये मी त्यांच्याबरोबर बसलोय. मी त्यांच्या मानतल्या कल्पना बघितल्या, ऐकल्या आहेत. सगळे काही अप्रतिम होते. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, नितीन देसाईंची आत्महत्या मनाला चटका लावून गेली. ही खूप दुर्दैवी आणि दु:खदायक घटना आहे. असे कोणी करू नये. नितीन देसाईंनी आत्महत्या का केली ? तर मला कारण सांगण्यात आले की, त्यांची काहीतरी आर्थिक अडचण होती. परंतु, त्यांच्यात क्षमता होती. ते त्या आर्थिक अडचणींवर मात करू शकले असते. पोलीस तपासात सत्य समोर येईल. तसेच इतरांच्या वक्तव्यांमधून समोर येईल. परंतु हे सगळे दु:खदायक आहे.



अभिनेते, दिग्दर्शक प्रवीण तरडे हे त्यांना गेल्या 21-22 वर्षांपासून ओळखतात. नितीन देसाई यांच्या आत्महत्येचे वृत्त ऐकून त्यांनाही मोठा धक्का बसला. दोन आठवड्यांपूर्वीच त्यांनी नितीन देसाई यांची भेट घेतली होती. मात्र या भेटीदरम्यान आपण त्यांचे मन मोकळे करू शकलो नाही याची खंत तरडेंनी व्यक्त केली. मराठी माणसाचे खूप मोठे नुकसान झाले. बॉलिवूड ही खूप मोठी नगरी आहे आणि त्यात हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच मराठी माणसे यशस्वी आहेत. नंबर एकच यसशवीपण नितीन देसाईंनी कमावले होते.

नितीन देसाई यांचा मोबाईल पोलिसांना ताब्यात घेतला आहे. ज्या ऑडिओ क्लिपची आता चर्चा रंगत आहे, त्या ऑडीओ क्लिपची पडताळणी फॉरेन्सिक टीम करत आहे. नितीन देसाई यांनी काही लोकांची नावे या ऑडीओ क्लिपमध्ये रेकॉर्ड केल्याची माहिती देखील समोर येत आहे. पण ती नावे कोणची आहेत हे अद्याप समोर आलेले नाही. ऑडीओ क्लिपची पडताळणी सर्वप्रथम पोलिसांकडून केली जाईल. शिवाय नितीन देसाई यांच्या मोबाईलमध्ये असलेल्या ऑडिओ क्लिप त्यांच्याच आवाजातील आहेत का ? याची खात्री रायगड पोलिसांकडून करण्यात येणार आहे.

## भिडे गुरूजी समर्थनार्थ आंदोलन करणारे पोलिसांच्या ताब्यात

### आंदोलकांना पांगविण्यासाठी लाठीमार

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधींसह अनेक महापुरूषांविषयी तसेच भारतीय तिरंगा ध्वजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणा-या शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेचे संस्थापक मनोहर कुलकर्णी ऊर्फ संभाजी भिडे यांच्या विरोधात राज्यभर आंदोलन होत असताना भिडे गुरूजींच्या समर्थनार्थ सोलापुरात आंदोलन करण्यासाठी एकत्र आलेल्या शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आक्षेपार्ह वर्तन केल्याने आंदोलकांवर पोलिसांनी बळाचा वापर करून जेरबंद केले.

भिडे गुरूजींनी राष्ट्रपिता महात्मा गांधी, महात्मा जोतिराव फुले, राजा राममोहन राय, पं. जवाहरलाल नेहरू, रामास्वामी पेरियार व अन्य महापुरूषांवर गरळ ओकणारी वक्तव्ये केली आहेत. तसेच भारतीय तिरंगा ध्वजाचाही अवमान केला आहे. त्यामुळे भिडे गुरूजींच्या विरोधात राज्यभर आंदोलने होत आहेत. त्यांच्या अटकेची मागणी करताना सत्ताधारी भाजप त्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर दुसरीकडे शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेने भिडे गुरूजींच्या समर्थनार्थ आंदोलन हाती घेतले आहे. सोलापुरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलनासाठी आलेल्या सुमारे १५ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तत्पूर्वी, काही आंदोलकांनी जुना पुणे चौत्रा नाक्यावरील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ भिडे गुरूजींच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. आंदोलकांना ताब्यात घेऊन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आणले. तेव्हा तेथे भाजपसह हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी धाव घेऊन पोलिसांशी हुज्जत घातली. त्यामुळे पोलिसांना शेवटी बळाचा वापर करून गर्दीला हुसकावून लावले. याचवेळी भाजप व बजरंग दलाचे पदाधिकारी राजकुमार पाटील यांनी वाद घातल्याने त्यांनाही पोलिसांचा ' प्रसाद ' मिळाला.

## काँग्रेस पक्षाला खिंडार पडणार : केसीआर

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** राज्यात शिवसेना फुटली. त्यापाठोपाठ वर्षभरात राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडली. त्यामुळे आता काँग्रेसमध्ये फूट पडणार असल्याच्या जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनीही एक धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. काँग्रेसला लवकरच खिंडार पडणार असल्याचे के. चंद्रशेखर राव यांनी सांगितले. त्यामुळे काँग्रेसमध्ये मोठी फूट पडणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. तसेच काँग्रेसमधील कोणता नेता बंड करणार ? यावरही जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे कोल्हापुरात आले होते. यावेळी मीडियाशी संवाद साधताना त्यांनी हा दावा केला. त्यामुळे खळबळ उडाली आहे. शरद पवार आम्हाला भारतीय जनता पार्टीची बी टीम समजत होते. आज त्यांच्या पक्षाची काय स्थिती झाली आहे हे तुम्हाला माहिती आहे. महाराष्ट्रात शिवसेना फुटली, राष्ट्रवादी काँग्रेस फुटली, आता काँग्रे ही फुटण्याच्या मार्गावर आहे, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत हे सरकार उदासीन आहे. आम्ही तेलंगणा पॅटर्न राबवण्याच्या सूचना केल्या होत्या. महाराष्ट्रातीलच एका अधिकाऱ्याने एक लाख शेतकरी आत्महत्या करण्याच्या मनस्थितीत असल्याचा अहवाल दिला, मात्र सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे, असा दावाही त्यांनी केला.

## पाकिस्तानात भीषण बॉम्बस्फोट; नेत्यासह ४४ नागरिकांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा येथे रविवारी जोरदार बॉम्ब स्फोट झाला. या स्फोटात 44 लोकांचा मृत्यू झाला आहे. तर 150 जण जखमी झाले आहेत. हा बॉम्ब स्फोट खैबर पख्तूनख्वाच्या बाजौर जिल्ह्यातील खार तालुक्यात झाला आहे. जमीयत उलेमा इस्लाम फजलच्या रॅलीवेळी हा बॉम्ब स्फोट झाला. या स्फोटातमौलाना जियाउल्लाह जान यांचा मृत्यू झाला आहे. या स्फोट अत्यंत शक्तीशाली होता. स्फोट होताच लोक प्रचंड घाबरले आणि मिळेल तिकडे सैरावैरा धावत होते. त्यामुळे अनेकांना मारही लागल्याचे सांगितले जाते. मात्र, या स्फोटाने पाकिस्तान पुरता हादरून गेला आहे.

जमीयत उलेमा इस्लाम फजलचा नेता मौलाना जियाउल्लाह जान यांचा बॉम्ब स्फोटात मृत्यू झाला आहे. या स्फोटातील जखमींना तात्काळ पेशावर आणि टिमरगेरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी बॉम्ब स्फोट झाला त्या ठिकाणी तात्काळ मोठा बंदोबस्त वाढवण्यात आला होता. तसेच घटनास्थळी रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. या रुग्णवाहिकांमधून मृतदेह आणि जखमींना तात्काळ रुग्णालयात नेले जात होते. दरम्यान जेयूआयएफचे नेते मौलाना फजलूर रहमान यांनी पंतप्रधान शहबाज शरीफ आणि स्थानिक सरकारकडे या हल्ल्याच्या चौकशीची मागणी केली आहे. तसेच या स्फोटानंतर जेयूआयएफच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी रुग्णालयात धाव घेऊन रक्तदान करण्याचे आवाहनही केले. हा मानवतेवरील हल्ला असल्याची प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली आहे. या हल्ल्याचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जमीयतच्या रॅलीत लोक मोठ्या प्रमाणावर जमले होते. मंचावर पक्षांच्या नेत्यांची भाषणे सुरू होती. यावेळी जमावाकडून जिंदाबाद, जिंदाबादच्या घोषणा दिल्या जात होत्या. यावेळी मंचावरून एक आरोळी आली. हजरत मौलाना अब्दुल रशीद साहब जिंदाबाद, जिंदाबाद या आरोळी सरशी कार्यकर्त्यांनीही जिंदाबादच्या घोषणा देण्यास सुरुवात केली.

## दहावीच्या विद्यार्थिनीने चालविले तहसील कार्यालय!


### वैजापूर तहसील प्रशासनाने राबविला अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

शांताराम मगर

वैजापूर : 1ते 7 ऑगस्ट यादरम्यान महसूल व वन विभाग महाराष्ट्र राज्य मार्फत राज्यभरात महसूल सप्ताह मोठ्या प्रमाणात उत्सव स्वरुपात राबविला जात आहे. त्या धर्तीवर वैजापूर महसूल प्रशासनाने आज 2 ऑगस्ट रोजी युवा संवाद अंतर्गत मा. तहसीलदार सुनिल सावंत यांनी करुणानिकेतन विद्यालय वैजापूर येथील विद्यार्थ्यांना दुपारी 12 ते 2 वाजेपर्यंत तहसील कार्यालय चालविण्याचा अनुभव दिला तसेच त्यांच्या सोबत संवाद साधून त्यांना महसूल प्रशासना बदल मार्गदर्शन केले यावेळी करुणा निकेतन विद्यालयातील विद्यार्थिनी कु. कल्पेश शेटे हिने तहसीलदार यांच्या खुर्चीत बसुन सामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला यावेळेस सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिवंसरा यांनी नवनियुक्त तहसीलदार यांच्याशी संवाद सधला तसेच कु.अनुष्का संतोष कावळे हिने नायब तहसीलदार महसूल 1 यांच्या खुर्चीत बसुन काम पार पाडले कु.स्नेहल निष्णात बागूल हिने नायब तहसीलदार महसूल 2,अथर्व नीलेश चव्हाण याने नायब तहसीलदार निवडणूक, प्रथमेष जालिंदर माळवदे ह्याने नायब तहसीलदार संजय गांधी, समृद्धी राजेंद्र महापूरे हिने अकाऊंट, रोहित बापू कदम ह्याने अव्वल कारकून ह्या खुर्चीत बसून कामकाज पाहिले यावेळी तहसीलदार सुनील सावंत, ना कुलकर्णी साहेब ना तहसीलदार, मा.नारखेडे साहेब ना तहसीलदार, दिलीप त्रिभुवन अव्वल कारकून, नितीन येलगटवार महसूल सहाय्यक, सचिन गायकवाड ऑपरेटर यांनी या विद्यार्थ्यांना त्यांच्या सोबत बसुन मार्गदर्शन केले.यावेळी विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना आपल्या मुलांना अधिकारी म्हणुन काम करतांना पाहून खूप आनंद झाला त्यांनी तसेच शाळेतील शिक्षकांनी महसूल प्रशासनाचे आभार व्यक्त केले. तहसीलदार सावंत साहेब यांनी राबविलेल्या उपक्रमाची तालुकाभर चर्चा होत आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'बाळांनो, तुम्हाला आश्चर्य वाटेल पण या गाण्याच्या संगीतकार लतादीदीच आहेत. त्यांनी 'आनंदघन' या नावाने काही चित्रपटांना संगीत दिलं होतं' श्यामलाताई म्हणाल्या. तेवढ्यात गाडीने एक वळण घेतले आणि दूरवर गावाच्या खुणा दिसायला लागल्या. थोडं अंतर गेल्यानंतर एका मोठ्या कमानीतून गाडी आत शिरली. एका मोठ्या चिंचेच्या झाडाखाली शयमरावांनी गाडी पार्क केली. या गावात श्यामरावांचा बालमित्र सोपान राहत होता. श्यामराव आल्याचं कळताच सोपान मोठ्या आनंदानं त्यांच्या स्वागतासाठी पुढे झाला. दोन्ही मित्रांची खूप दिवसांनी भेट होत होती. दोघांनीही एकमेकांना घट्ट मिठी मारली. श्यामराव म्हणाले, ' अरे सोपान, ही माझी मुलं. त्यांना एखादं खेडेगाव बघावं असं वाटत होतं. म्हणून तुझ्याकडे हक्काने आणले त्यांना. त्यांना जरा गावातून फिरवून आणू या.'' अरे हो पण आधी आपण घरी जाऊ. तुम्ही सगळे फ्रेश व्हा. मग जाऊ की मुलांना गाव दाखवायला. ' सोपान म्हणाला. सोपानच घर म्हणजे एक जुना वाडा होता. दगडी बांधकाम आणि लाकडाचं छत. घरात स्वच्छता, उजेड भरपूर होता. बाहेरच्या उन्हाचा अजिबात ताप जाणवत नव्हता. निर्मलावहिनींनी सगळ्यांना घर दाखवलं. निर्मलावहिनी सगळ्यांसाठी गूळ घातलेलं कैरीचं पन्हं घेऊन आल्या. सगळ्यांच्या छानपैकी गप्पा झाल्या. श्यामलाताई मुलांना म्हणाल्या, ' बाळांनो, सोपानकाकांचं घर नीट पाहिलंत का ?'' हो आई,' पिंकी आणि राजेश म्हणाले. 'बाळांनो, तुमच्या एक गोष्ट लक्षात आली का ? सोपानकाकांकडे फ्रिज नाही. ' श्यामलाताई म्हणाल्या. '' अग आई, खरंच की. ही गोष्ट लक्षातच आली नाही आमच्या. ' पिंकी म्हणाली. बाळांनो, आता आपण कैरीचं पन्हं घेतलं. किती चवदार होतं ते ! थम्स अप, कोका कोला,पेप्सी यासारखी कृत्रिम शीतपेयं पिण्यापेक्षा घरीच बनवलेलं कैरीचं पन्हं, लिंबाचं सरबत, कोकम सरबत, यासारखी पेयं शतपटीनं आरोग्यदायी असतात. कृत्रिम शीतपेयात मोठ्या प्रमाणावर साखर आणि घातक रसायने असतात. शिवाय फ्रिजपेक्षा माठातील पाणी आरोग्याला अतिशय चांगले असते. '' व्हय व्हय पोरांनो, तुमची आई सांगते ते बरोबर आहे बरं का. आणि एक सांगतो. आमच्याकडे कोणीच चहा घेत नाही. गोठ्यात गाई आहेत. त्यांचे ताजे दूध असते. घरीच बनवलेलं ताक, दही आम्ही वापरतो. शेतातील ताज्या भाज्या, फळे आम्ही खातो. फ्रिजची गरजच नाही. ' श्यामराव हसत हसत म्हणाले, ' हे आमच्या सोपानरावांच्या उत्तम तब्येतीचं रहस्य आहे म्हणायचं. '



समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## अनुभव अंतर्मनावर प्रतिबिंबित होतात

आधुनिक केसरी

आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि अपयश आपल्या वाट्याला येतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत एकूण सत्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन, ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## विटेवरी पाही | हरि एक ||

हरिनाम नित्य | वदावे मुखाने ||
चालावे वाटेने | पंढरीच्या ||१||
करावे सत्कर्म | भाव ठेवोनिया ||
द्यावे सोडोनिया | अहंकारा ||१||
वाचाळ जीवाचा | नको मना संग ||
साधनेचा भंग | फुका होतो ||३||
कर्माचे आपुल्या | जाणोनिया वर्म ||
पाळावा स्वधर्म | सर्वकाळ ||४||
माझे तुझे आता | उरले न काही ||
विटेवरी पाही | हरि नाम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


त्वां त्रिगुणात्मिकां देवीं भजाम्यहं सदा सदा | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५६ ||
मी तुला त्रिगुणात्मिक देवीला सदैव भजतो. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बिना ज्ञान नहिं भक्ति है, ज्ञान भक्ति का प्रान ।
वीतराग में भक्ति है, भक्ति न हो अज्ञान ।।२४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय) ०४/०३/२४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : विवेकाद्वारेच सर्व पदार्थांचे ज्ञान होते. ज्ञानाशिवाय कुठलेही कार्य सहजगत्या सफल होऊ शकत नाही , म्हणून ज्ञानाशिवाय भक्ती होत नाही. ज्ञान हाच भक्तीचा प्राण, जीवन आहे. विषयरहित होणे वैराग्य आहे. विषय-भोग रहित वैराग्यवान पुरुषच भक्तीला प्राप्त करतो ; अज्ञान आणि मोहात भक्ती होत नाही. पूर्ण ज्ञानवान आणि वैराग्यवान पुरुषच भक्तीच्या महान सुखाला पूर्णरूपेण प्राप्त करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ३६ वे

स्वगृहात श्रीमहाराज राहू लागले
परिचित रोज भवती बसू लागले
गीतामाऊलीचे मन आनंदुनी गेले
प्रवासगोष्टी ऐकण्यात रमुनी गेले ।।
पंचक्रोशीतुन दर्शनासी लोक आले
नाम घेत जावे, महत्व नामाचे बोलले
श्रीमहाराजांचे बोल प्रेमाचे पटले
जनमानसात गणुबुवा नाव झाले ।।
घर,गैरसोयीची जागा,असे वाटले
विठ्ठलमंदिरासमोरच्या ओट्यावरती
श्रीमहाराज नित्यनेमे बसु लागले
जटाधारी,माळ हाती,गणुबुवा शोभले ।।
बैरागी गणुबुवा,गृहस्थ वेषात आले
वास्तव्य घरातच जास्त होऊ लागले
प्रपंची रुपात पाहुनी आपल्या मुलाला
रावजी-गीतामाई मनोमन आनंदले ।।
दिनचर्या-नित्यकर्म नियमे होई
घेउनी विठोबा-रखुमाईचे दर्शन
करिती श्रीदासबोधाचे हो निरूपण
निरसन भक्तांचे होई, देती समाधान ।।
लेखनउपक्रम करी कवी-अरुणदास
माझ्या लेखणीचा हा अक्षर - बहुमान ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नाम कुठवर घ्यावे ?

आधुनिक केसरी

नाम कुठवर घ्यावे ? आपला श्वासोच्छवास चालू आहे, किंवा स्वतःची स्मृती आहे, तिथपर्यंत नाम घ्यावे. आपण श्वासोच्छवास जसा मरेपर्यंत घेतो तसेच नामाचे आहे. बरोबर भाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, श्वासोच्छवास थांबला म्हणजे मरण येते त्याचप्रमाणे नामाशिवाय जगणे हे मेल्यासारखेच आहे, असे वाटले पाहिजे. अक्षरशः जीव जाईपर्यंत, म्हणजे मीपणाने मरेपर्यंत नाम घेत सुटावे. शेवटी 'मी' जातो आणि नाम शिल्लकच उरते. नाम घेऊन कधी पुरे होऊ शकत नाही. मुक्ती मिळाली की सर्व पुरे झाले असे म्हणतात, पण मुक्तीनंतरही जर काही कर्तव्य उरत असेल तर ते नामस्मरणच.

माणसाला गुंगीचे औषध दिले म्हणजे त्याला गुंगी आली की नाही हे पाहण्यासाठी अंक मोजायला सांगतात. अंक मोजता मोजता तो थांबला की, तो देहभानावर नाही असे ठरते. तसे, नाम घेता घेता 'मी नाम घेतो' हेही स्मरण जेव्हा राहात नाही तेव्हाच त्या नामात रंगून गेलेल्या माणसाचे पर्यवसान 'एकांतात' होते. एकांत म्हणजे नाम घेणारा मी एक, ह्या एकाचाही अंत होणे म्हणजेच देहबुध्दीचा विसर पडणे, देहबुध्दीच्या पलीकडे जाणे. नाम घेता घेता अशी स्थिती प्राप्त झाली, म्हणजे त्याचे चित्त भगवंताकडे आहे की नाही असा प्रश्न करायला वावच कुठे राहतो ? निद्रानाशाचा रोग झाला तर झोप लागेपर्यंत झोपेचे औषध आपण घेतो, तसे आपल्याला स्वाभाविक समाधान मिळेपर्यंत आपण नाम घेतले पाहिजे. नाम उपाधिरहित असल्याने आपणही उपाधिरहित झाल्याशिवाय नामाचे प्रेम आपल्याला येणार नाही. नामाने आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य लाभून त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना, ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते.



नामजपाची संख्या नोंद करून ठेवावी का ? अमुक एक संख्येपर्यंत जप करण्याचा संकल्प केला असेल, किंवा रोजचा काही कमीत कमी जप करण्याचे ठरविले असेल, तर जपसंख्येची नोंद करून ठेवणे जरूर आहे. जपाची सवय होण्याच्या दृष्टीने, आणि नेमाने काहीतरी किमान जप झाल्याशिवाय दिवस जाऊ नये या दृष्टीनेही, जपसंख्येची नोंद करावी. मात्र असे करताना एका बाबतीत खबरदारी घ्यावी; ती म्हणजे, आपली आजची नामसंख्या पुरी झाली, आता उद्यापर्यंत आपला आणि नामाचा काही संबंध नाही, अशा तऱ्हेची वृत्ती होण्याचा संभव असतो त्याला जपावे आणि नेमाची संख्या पुरी झाली तरी होईल तेवढे आणखी नाम घेण्याची सवय ठेवावी.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

गुरु तुम्हाला बंधन करण्यासाठी नसतात तर तुमची योग्यता वाढवून तुम्हाला त्यांच्या पेक्षा मोठे करावे या प्रेमळ उद्देशाचे असतात आणि आपल्याला जे अनावशक आहे ते टाळण्याकडेच त्यांचा कटाक्ष असतो आपण मात्र अज्ञानाने नको त्याच गोष्टी करून स्व:तची फसवणूक करून घेण्यातच स्व:तला धन्य मानण्याचा पराक्रम करत असतो.गुरुमाउलीचे एकच एक बंधन असते ते म्हणजे फक्त त्यांचे आज्ञा पालन. कारण गुरूच्या नकारात हि शिकवणच असते तर ज्ञान त्यांच्या चरण कमलात असते. आणि आज्ञा पाळणे अंगवळणी पडले पाहिजे त्याचा कधीच प्रश्न न वाटावा असी वागणूक झाली कि आपण सदशिष्य होतो. संत कर्माने जनकल्याण करतात. अन सद्गुरूच्या नुसत्या अस्तितवाने कल्याण होते. तेव्हा त्यांच्या अस्तित्वाचा भाव असावा! आपण सद्गुरुनी दिलेले नाम . क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये ।पश्य वानरमूर्खेण चटका निर्गृहीकृता ॥स्पष्टीकरण - मूर्ख माणसे स्वतःला अधिक शहाणी समजतात. त्यांना उपदेश करण्याच्या भानगडीत पडू नये. ते स्वतः तर सुधारणार नाहीतच; उलट तुमचे मात्र नुकसान करतील. एक पक्षीण स्वतःच्या घरट्यात निवाऱ्याला बसून शेजारच्या फांदीवर पावसापाण्यात कुडकुडत बसणाऱ्या वानराला म्हणाली, 'बाबा रे ! माझ्यासारखं तूही घर बांध, म्हणजे तुला असं पावसापाण्यात भिजून कुडकुडावं लागणार नाही.' तो उपदेश ऐकून त्याने घर तर बांधले नाहीच; उलट पक्षिणीचे घरटे मात्र मोडून टाकले.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे




पडका भिडेवाडा; मोदींच्या स्वागतास खोडा!

पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २९ जुलै २०२३



वाचाळविरांचा सरदार कोण ?

पान ७

# महापुरुषांचा अपमान करण्याचे लायसन भाजपाने संभाजी भिडेला दिले का : नाना पटोले

## लोकांना जिवे मारण्याचे हिंदुत्व भाजपा व फडणवीसांना मान्य आहे का?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनोहर कुलकर्णी उर्फ संभाजी भिडे हा व्यक्ती राजरोस महापुरुषांचा अपमान करत आहे परंतु भाजपाचे सरकार त्यावर कारवाई करत नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, साईबाबा यांच्यासंदर्भात गरळ ओकणारा भिडे नावाचा इसम अजून मोकाटच आहे. महापुरुषांचा अपमान करण्याचे लायसन भाजपाने संभाजी भिडेला दिले आहे का ? असा संतप्त सवाल करत भिडेवर कारवाई करण्याच्या मागणीवर काँग्रेस पक्ष ठाम आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे.

विधान भवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे सरकार संभाजी भिडेला पाठीशी घालत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संभाजी भिडेचा उल्लेख गुरुजी असा करतात, भिडेला पोलिसांचे मोठे संरक्षण दिलेले आहे, सत्ताधारी भाजपला हा भिडे एवढा मोठा माणूस वाटतो का ? संभाजी भिडेचे सहकारी ज्यांना धारकरी म्हणतात ते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व माजी मंत्री आ. यशोमती ठाकूर यांना जीवे मारण्याची धमकी देतात. लोकांना जीवे मारण्याचे हे कसले हिंदुत्व, हे हिंदुत्व फडणवीस यांना मान्य आहे का ? भाजपाचे खायचे दात व दाखवायचे दात वेगळे आहेत. महाराष्ट्र हा शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराचा आहे, या राज्यात भाजपा संभाजी भिडे सारख्या व्यक्तींना पुढे करुन वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपाला महाराष्ट्राचा मणिपूर करायचा आहे याचा पुनरुच्चार पटोले यांनी केला. भाजपा पेटवण्याचा प्रयत्न करत असला तरी राज्यातील जनता मात्र अशा षडयंत्राला बळी पडणार नाही, असेही नाना पटोले यांनी सांगितले.



**भाजपा सरकार व प्रशासनाच्या उधळपट्टीमुळेच 'बेस्ट' कामगार रस्त्यावर :** बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संपावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता नाना पटोले म्हणाले की, जी-२० परिषदेच्या नावाखाली मुंबई शहरात मोठी सजावट करण्यात आली, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मोठे-मोठे फोटो लावण्यात आले. नाल्याचे पाणी दिसू नये म्हणून मोठे पडदे लावण्यात आले तसेच रस्त्यावर जागोजागी दिव्यांची आरास करण्यात आली. या सजावटीवर कोट्यवधी रुपयांची उधळले गेले. सुशोभीकरणाच्या नावाखाली ३ हजार ५०० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. शासन व प्रशासनाला जनतेचा पैसा जी-२० वर उधळण्यास आहे पण कर्मचाऱ्यांना देण्यास नाही. म्हणूनच बेस्ट कर्मचाऱ्यांना आज रस्त्यांवर येण्याची वेळ आली आहे.



# चिमुर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात नागभिड, ब्रह्मपुरी,सिन्देवाही, सावलीचा समावेश करू नये

## रास्ता रोको आंदोलनाला शेकडो नागरिक उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील नागभिड, ब्रह्मपुरी, सिन्देवाही, सावली या तालुक्याचा शासनाने नुकताच चिमुर जिल्हाधिकारी कार्यालयाल क्षेत्रात समावेश केल्याने त्यांच्या विरोधात घोडाझरी तलावामध्ये जलसमाधी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. दरम्यान आज दुपारी १२वाजतापासुन आंदोलन कर्ते घोडाझरी तलावांचे मुख्य प्रवेश व्दाराजवळ एकत्र आले. मात्र या आंदोलनाला पोलिस प्रशान व तहसिल प्रशाशनाने नागभिड- तळोधी या प्रमुख महामार्गावर असलेल्या घोडाझरीच्या मुख्य प्रवेशद्वारावर हे आंदोलन रोखून धरल्याने येथे काही वेळ तनाव निर्मान झाला होता. मात्र आंदोलकाना प्रशासन जुमानत नव्हते. आणी शेवटी आंदोलकांनी आक्रमक भुमिका घेवून प्रशाशनाचे विरोधात नारेबाजी करून निषेध करत दोन तास रास्ता रोको आंदोलन केले यामुळे वाहतूक एक किलोमिटर पर्यंत थांबुन होती..या वेळी प्रशाशन मुर्दा.....चे नारे देऊन चिमुर चे आमदारांचा ही निषेध करण्यात आला.

या आंदोलनामध्ये तिन्ही तालुक्यातील सषर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. पोलीस विभागाने तगडा बंदोबस्त ठेवला होता. नागभीडचे तहसिलदार यांना यावेळी निवेदन देऊन या आंदोलनाची सांगता करण्यात आली. या संदर्भात नागभिड जिल्हा निर्मीती कृती समितीचे पदाधिकारी यांनी मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री,व उपमुख्यमंत्री यांनी प्रत्यक्ष भेटून चिमुर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात या तालुक्यांचा समावेश करू नये असा प्रकारचे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

# झाडातून निघतेय पाण्याची धार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जगप्रसिद्ध ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील एक विडिओ सध्या व्हायरल झाला आहे. हा विडिओ प्रकल्पातील कोळसा वनपरिक्षेत्रातील आहे. वनक्षेत्रातील 'येना' या झाडातुन चक्क पाणी बाहेर पडत आहे. नळातून येणाऱ्या धारे एवढ्या स्पीडने पाणी बाहेर येत आहे.हा व्हिडीओ जानेवारी २०२३ मधील असल्याचे सांगण्यात येत आहे. ताडोबाच्या कोळसा वन परिक्षेत्रातील कंपार्टमेंट क्रमांक ३०६ मध्ये हा विडिओ घेतला गेल्याची माहिती आहे. हा विडिओ समाजमाध्यमात व्हायरल झाला आहे.

# तहसीलदारांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे



आधुनिक केसरी न्यूज

**अहिरे :** (ता. खंडाळा) गावातील स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार व व्यवसाय प्राधान्याने मिळावा म्हणून गेले १३ दिवस धरणे आंदोलन व ७ दिवस आमरण उपोषणाचा मार्ग अहिरे ग्रामस्थांनी तथा आंदोलकांनी स्वीकारला होता.

प्रामुख्याने अहिरे गावच्या हद्दीत असलेल्या कंपन्यांच्या उभारणीसाठी स्थानिक भूमिपुत्रांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. येथील कंपन्यांची उभारणी व विस्तार अत्यंत विस्तृत स्वरूपात झाला आहे.तरी देखील स्थानिकांना कुशल व अकुशल कामांसाठी प्राधान्य दिले जात नाही. कामाचा विचार केला तर जे कामगार कंपनीत कामांवर जातात,अशा कामगारांना बारा तासाची ड्युटी करावी लागते, सोबतच वेळोवेळी कामगार धोरणाप्रमाणे पगारवाढ देखील केली जात नाही, भविष्य निर्वाह निधीचीही तरतूद केली जात नाही.तसेच कंपनीतून वाहतूकीसाठी लागणारी वाहने स्थानिकांची घेतली जात नाही.त्यामुळे ग्रामस्थांचे कंपनी प्रशासनांबद्दल संतापाचे वातावरण होते.वेळोवेळी ग्रामस्थांचा खंडाळा तहसील कार्यालयावर मोर्चा देखील काढण्यात आला होता.यामध्ये प्रामुख्याने महिलांची विशेष उपस्थिती,तरुणांचा पुढाकार, ज्येष्ठांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या मोर्चाची दखल खंडाळा प्रशासनाला घ्यावी लागली. अखेर हा मोर्चा यशस्वी झाला. अखेर तहसील कार्यालय खंडाळा येथे स्थानिक भूमिपुत्रांच्या न्याय हक्का संदर्भात खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांनी बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ, सहाय्यक कामगार आयुक्त दिसले, पोलीस निरीक्षका वंदना श्रीसुंदर ,नायब तहसीलदार चेतन मोरे, योगेश चंदनशिवे, कंपनी प्रशासनाच्या वतीने क्यूबिल्ट इंजिनियर्स, विकेटमेव्ह कंटेनर्स, पारेख प्लास्ट, त्रिमूर्ती ऑटोडेको,पनाश ॲल्युमिनियम, राज प्रोसेस, चिक्स फीड प्रीमियम, अथर्व प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे प्रतिनिधी व अहिरे येथील प्रमुख ग्रामस्थ उपस्थित होते.




# देसाईंची आत्महत्या

आधुनिक केसरी

सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी आत्महत्या केल्याची बाब उघड झाल्यानंतर खळबळ उडाली आहे. नितीन देसाई हे मराठी व हिंदी चित्रपटसृष्टी, तसेच मालिका व नाटकांसाठी भव्य असे सेट उभारण्यासाठी प्रसिद्ध होते. मात्र, कर्जतमधील त्यांच्या स्टुडिओमध्ये त्यांनी मंगळवारी रात्री गळफास घेऊन आत्महत्या केल्यामुळे कला, सामाजिक व राजकीय क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. मात्र, आता त्यांच्या आत्महत्येमागच्या कारणांचा शोध घेतला जात असून त्यासंदर्भात मनसेच्या रायगड अध्यक्षांनी गंभीर दावा केला आहे. नितीन देसाई यांनी त्यांच्या एन. डी. स्टुडिओमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बाब बुधवारी सकाळी स्टुडिओमधील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी पोलिसांना कळवल्यानंतर हा सगळा प्रकार उघड झाला. त्यानंतर नितीन देसाई यांच्यावर तब्बल २४९ कोटींचे कर्ज असल्याची बाब समोर आली. कर्जबाजारीपणामुळेच नितीन देसाई यांनी आत्महत्या केल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे रायगड अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी या प्रकरणात टीव्ही ९ शी बोलताना थेट कला क्षेत्रातील काही नामांकित मंडळींच्या दिशेने अंगुलीनिर्देश केला आहे. जितेंद्र पाटील यांनी नितीन देसाई अस्वस्थ होते असे सांगितले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ते जरा अस्वस्थ होते. अनेक बाबींवर ते चर्चा करायचे. आर्थिक अडचणी वगैरे तर होत्याच. पण त्यांच्याच कला क्षेत्रातून काही नामांकित व्यक्तींकडून एन. डी. स्टुडिओला शूटिंग येऊ दिल्या जात नव्हत्या. ते हे सगळे माझ्याशी बोलायचे. पण या सगळ्या गोष्टी फार क्लेशदायक आहेत, असे जितेंद्र पाटील म्हणाले आहेत. आज घटना घडली आहे. लोक दादांना (नितीन देसाई) भावपूर्ण श्रद्धांजली देतील. पण या मूळ गोष्टीकडे लोकांचे लक्ष गेले पाहिजे. एवढा मोठा मराठी कलावंत आपल्यातून हरपलेला आहे. याला कारणीभूत कोण याच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे, असे जितेंद्र पाटील यांनी नमूद केले. दरम्यान, यावेळी बोलताना जितेंद्र पाटील यांनी निर्माते-दिग्दर्शकांवर दबाव टाकला जायचा, असा दावा केला आहे. खरंतर खूप दिवसांपासून एन. डी. स्टुडिओकडे येणाऱ्या शुटिंग रद्द केल्या जायच्या. त्या कोण रद्द करायचे? निर्माते-दिग्दर्शकांवर कोण दबाव टाकायचे? हा मोठा प्रश्न आहे. इतका मोठा स्टुडिओ चालवताना त्यांना शूटिंगची कामे मिळणे महत्त्वाचे होते. पण ते येणे कुणामुळे बंद झालं हा संशोधनाचा विषय आहे, असे पाटील म्हणाले. नितीन देसाईंवर २४९ कोटींचे कर्ज होते, अशी बाब आता समोर आली आहे. त्यांनी सीएफएम या वित्तीय संस्थेकडून १८० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी त्यांनी ४० एकरच्या तीन मालमत्ता तारण म्हणून ठेवल्या होत्या. कालांतराने सीएफएम या वित्तीय संस्थेने आपल्याकडील सर्व कर्ज खाते एडलवाइस अॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीकडे सोपवली. नितीन देसाई यांच्याकडच्या कर्जाची वसुली होत नव्हती. हळूहळू सुरुवातीला १८० कोटी असणारी कर्जाची रक्कम व्याजासह थेट २४९ कोटींवर जाऊन पोहोचली.

# वैचारिक नागवेपणा

आधुनिक केसरी



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

**पुत्रप्रेम व सत्ता लोभापाई आणि अहंकाराने भारलेल्या धृतराष्ट्र व दुर्योधन पिता-पुत्राने अविचारीपणाने वागून शंभर कौरवांसह भीष्म, गुरुद्रोण, कृपाचार्य यांच्यासह संबंध कुरुवंश बुडविला. शेवटी हाती काय आले किंवा काय लागेल याचा थोडाही विचार न करता अविस्मरणीय असे महाभारत घडविले. महाभारत म्हणजे द्वेष, मत्सर, अहंकाराने भरलेला तुडुंब सागर जो शतकानूशतके भारतीयांना ज्ञात आहे. त्याच विचारांचे अनुकरण करून, भारतीय संस्कृतीत अनेक कुटुंबासह समाजकारण व राजकारण चालत असते. येथे नीतिमत्ता, आचार, विचार, प्रेम, प्रामाणिकपणा संवेदनशीलता, अजिबात नसते.**

नेमकी अशीच स्थिती मागच्या दोन-तीन दशकापासून भारतीय राजकारणात चालू आहे. 'खोटे बोल पण रेटून बोल' याप्रमाणे वर्तमानातील भारतीय राजकारणाची दशा झाली आहे. अभ्यासू, प्रामाणिक व बुद्धिजीवी लोकांचा वावर सध्या राजकारणात अल्पसा दिसतो. येथे उमेदवारांच्या पात्र अपात्रतेचे कुठलेच कायदेशीर बंधन व नियम नसल्यामुळे सर्व स्तरावर 'अंधेर नगरी चौपट राज' स्थिती झालेली आहे. वर्तमानातील राजकारणाची व्याख्या करावयाची झाल्यास 'जिधर देखो उधर चोर ही चोर, और चोरौका बाजार' म्हणावयास हरकत नाही. बुद्धिजीवी, प्रामाणिक आणि पारदर्शिक स्वभावाचे लोक राजकारणापासून दूर असल्यामुळे मूळे अल्पशा मॅनेजड मताच्या टक्केवारीवरून हौसे-गौसे-नौसे राजकारणात प्रवेश करत आहेत. घटनेत उमेदवारांच्या पात्रता अपात्रतेला कुठेच लगाम नसल्यामुळे राजकारण हे सेवा कि नोकरी, हा मोठा संभ्रम निर्माण करणारा प्रश्न निर्माण झाला आहे. जर राजकारणाला सेवा म्हणावे तर वरेमाप वेतन भत्ते कशासाठी ?, सेवा असेल तर निशुल्क अथवा अल्पसे शुल्क असले पाहिजे, पण येथे सेवेच्या नावावर अरबो खरबोची कमाई असते. जर नोकरी म्हणावे तर यांना कुठलीच पात्रता अथवा योग्यतेची गरज नाही का ? वर्तमान राजकारणात बहुतांश राजकीय पुढारी हे खरेच बुद्धिवान अथवा चारित्र्यसंपन्न आहेत काय ? हा मोठा विचाराजोगा प्रश्न आहे. लेख विषयाच्या शीर्षकाचे थोडक्यात स्पष्टीकरण व्हावे म्हणून हा उपदव्याप. शब्द मर्यादेमुळे याचे सखोल विश्लेषण करणे शक्य नाही. सध्या देशात संसदेचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. संसदेसारख्या लोकशाहीच्या सर्वोच्च पवित्र दरबारात प्रत्येक लोकप्रतिनिधींनी आपापल्या मतदारसंघनिहाय जलकल्याण, जनविकासह देश विकासाचे प्रश्न पोट तिडकीने पुढे रेटून, देशासह जनकल्याण, जनविकासासह देशाचा विकास साधला पाहिजे हे सर्वांनाच अपेक्षित असते. म्हणूनच सामान्य जनतेला आपली बाजू समर्थपणे संसद अथवा विधिमंडळात मांडून जनहित साधले पाहिजे एवढीच उमेदवारांकडून जनतेची माफक अपेक्षा असते. सर्व अर्थाने जनतेला योग्य व तत्पर न्याय कसा मिळेल याच दृष्टीक्षेत्रातून लोकप्रतिनिधींची निवड होत असते पण वर्तमानातील कुठल्याही निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीना याचे फारसे गांभीर्य नसून, देशाच्या सर्वोच्च सभागृहात परस्परांचे उणे-दुणे काढून एकमेकांवर चिखलफेक करून 'खऱ्याला खोटे खोट्याला खरे' करून रेटून समोर ठेवण्यात आणि संसदे सारख्या पवित्र मंदिरात खुर्ची फेक, माईक तोड, परस्परांचे कपडेफाड, डोळेमार, अर्वाच्य भाषेत अपमानास्पद अपशब्द वापरून परस्परांची नामूश्की करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी करण्यातच जास्त वेळ खर्ची घालण्यात जातो. यावरून अशा लोकप्रतिनिधींना सुज्ञ, बुद्धिजीवी अथवा प्रामाणिक म्हणावे काय ? असे जनतेचे प्रामाणिक मत आहे. मी या ठिकाणी प्रामाणिक, बुद्धिजीवी, पारदर्शक व संवेदनशीलता या शब्दांचा मुद्दाम प्रयोग करत आहे कारण लोकप्रतिनिधींसह सर्व राजकारणी लोकांकडून अशा शब्द आचरणाची प्रत्यक्ष गरज असते. पण निवडून आल्यानंतर होते काही उलटेच. मला वरील शब्दाच्या व्याख्येत किंवा विश्लेषणात जायचे नाही कारण हे सर्वज्ञात आहे.




मी लेखाचे शीर्ष 'वैचारिक नागवेपणा' मुद्दामच निवडले आहे. त्याला दुसरे पर्यायी शब्दही आहेत उदाहरणात दुबळेपणा, दिवाळखोरी, वगैरे वगैरे. पण नागवेपण या शब्दात जो अर्थ तंतोतंत दडलेला आहे तो इतर शब्दात नाही. सध्या राज्यासह देशभरातील काही प्रश्न खूपच चर्चेत आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'पेटलेले मणिपूर' अशा संवेदनशील प्रश्नाबाबत सरकार व विरोधक या दोन्ही पकपक्षाकडून संवेदनशील व प्रामाणिक मनाने चर्चा होऊन दोन्ही पक्षांनी सखोल, पारदर्शकपणे चर्चा करून अशा प्रकरणाचा निपटारा केला पाहिजे, असे सर्वांनाच अपेक्षित असताना भूतकालीन सत्ताधाऱ्यांच्या हाती सत्ता नसल्यामुळे व परत हस्तगत करावी म्हणून जी आगपाखड चालू आहे ती कितपत जनतेला मान्य आहे याचा विरोधकांकडून सकारात्मकतेने विचार होणे गरजेचे वाटते. भूतकालीन सरकारच्या नाकर्तेपणामुळे देशभरातील आमजनतेने कंटाळून २०१४ पासून भारतीय जनता पार्टीला स्वीकार केला आहे. भविष्यात स्वीकारलेल किंवा नाही याचा अंदाज बांधण्यासाठी मी भविष्यकार नाही पण एक गोष्ट स्पष्ट जाणवते ती अशी की, सध्या विरोधकांची मोट रिकामी आहे, कारण सध्या देशात मटक्याच्या आकड्याचा खेळ चालू आहे. म्हणजेच ३१४ विरुद्ध १४२ असे संख्याबळाचे समीकरण म्हणजे आम जनतेने सध्यातरी भाजपला स्वीकारले आहे. माझे मते याचे ठोस कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावलेली देशाची प्रतिमा व देशांतर्गत विकास. माणूस कोणीही असो ते सर्व करण्यास सक्षम व समर्थ असल्यामुळे लोक मोदी- मोदी करत आहेत. शिवाय मोदी-योगी एक संन्यासी, त्यातील बरे वाईट परखून विकासासाठी एक योग्य निर्णय घेणारी क्षमता. इतर गोष्टीला फारसे महत्त्व नसल्यामुळे जसे प्रगती केली की विरोधक आपोआप तयार होतात असे म्हणतात. अगदी तसेच सर्व विरोधक मोदी वर तुटून पडतात यालाच विचाराचा नागवेपणा म्हणतात. आज देशहित, जनकल्याण सांभाळून देश चालविण्याचे सामर्थ्य कुठल्याच विरोधी नेत्यात दिसून येत नाही. जे काही विरोधकांची खिचडी होत आहे ते सर्व कोठेतरी भ्रष्टाचारात बुडालेले असल्यामुळे जनता अशा विरोधकांना भाव देत नाही हे स्पष्टच आहे.

मणिपूर बाबत विरोधकांच्या प्रश्नाला उत्तरे देण्यास गृहमंत्री समर्थ असल्यामुळे व ती गृहमंत्री व गृह खात्याचा प्रमुख म्हणून पूर्ण जबाबदारी आहे. पण खाते प्रमुखाचे ऐकून न घेता पंतप्रधानांनी बोलावे हा अट्टाहास कशासाठी ? तेही देशाच्या कुटुंबप्रमुख म्हणून पंतप्रधानांनी संसदेच्या बाहेर या प्रश्नावर चर्चा केली आहे. कदाचित यात काही उनिवा असतील तर सर्वांनी मिळून सत्ताधारी व विरोधक हे एकत्र बसून चर्चेअंती मार्ग निघू शकतात पण काहीतरी अडवणूक करून, कसेही वागून अविश्वास प्रस्ताव दाखल करणे हे कुठल्या विचाराचे धोतक आहे. शिवाय अविश्वास ठराव पारित करून घेण्यासाठी आपले संख्याबळ किती ? आपण त्यात यशस्वी होऊ काय किंवा नाही याचे साधे गणित करण्याची तसदी देखील विरोधक घेताना दिसत नाहीत. केंद्रातील सत्ताधारी भाजपाकडे सर्व मिळून ३२९ सदस्य आहेत. मोदी सरकारला अविश्वास प्रस्ताव जिंकणे सहज साध्य होईल. तेथे १४२ विरोधकांचे काहीच चालणार नाही म्हणजेच एकशे एकटक्के मोदी सरकार हा अविश्वास प्रस्ताव जिंकून विरोधकांचे नक्कीच वस्त्रहरण करेल. एवढी साधी सोपी गोष्ट सर्वसामान्य जनता ओळखते. मग हे विरोधकांना का कळत नाही ? केवळ सत्ता हाती हवी आम्ही कसे सरकार वठणीवर आणतो याचा उसना आव आणून आपले आपणच तोंड घाशी पडल्यासारखे नव्हे काय ? यालाच विरोधकांचे बुद्धीचातुर्य म्हणावे काय. आपण स्वतः होऊन तोंडघशी पडणे व आपली प्रतिमा आहे त्यापेक्षा आणखीन जास्तीची मलिन करून घेण्यासारखे नव्हे काय. शेवटी अशा वैचारिक नागवेपणातून विरोधक काय साध्य करणार ? नव्हे तर विरोधकांनी आपले बुद्धीचातुर्य दिवाळखोरीत काढल्यासारखेच वाटते. म्हणूनच विरोधकांच्या अशा विकृत वागणुकीला विचारांचे दुबळे पण किंवा दिवाळखोरी म्हणण्यापेक्षा विचारांचे 'वैचारांचा नागवेपणा' म्हणणे जास्त सोयीचे वाटते.

जनमनाच्या कानोस्या वरून जे स्पष्ट दिसते ते मी वास्तव प्रखरपणे माझ्या प्रिय वाचकांसमोर ठेवतो. ज्यांना पचेल त्यांनीच स्वीकारावे अन्यथा नाकारावे पण प्रखर वास्तवापासून दूर राहून चालणार नाही. हीच वर्तमान राजकारणातील लोकप्रतिनिधींची गत असल्यामुळे अशा बुद्धीहीन लोकप्रतिनिधींना जनतेने पुन्हा निवडून देऊन आपल्या पैशाचा व्यय करू नये एवढीच अपेक्षा. कोणी निंदा कोणी वंदा वास्तव प्रखरतेने सर्वांसमोर मांडणे हाच माझा एकमेव धंदा, कारण सत्य हे निर्विवाद सत्यच असते ते सर्वांच्या पचनी पडत नाही, सत्य पचवायला सत्याचा स्वीकार करावा लागतो.

जय हिन्द । इन्कलाब जिंदाबाद । लाल सलाम

# शाळेत मोबाईलबंदी घालण्याचा युनेस्कोचा सल्ला योग्यच


आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**युनेस्को या आंतरराष्ट्रीय संस्थेने विद्यार्थी शाळेत जो स्मार्टफोन वापरतात त्यावर बंदी घालावी अशी सूचना केली आहे. युनेस्कोच्या या सुचनेचे जगभर स्वागत होत आहे. युनेस्कोच्या या मतावर जगातील सर्वच शैक्षणिक आणि मानसोपचार तज्ज्ञांनी सहमती दर्शवली आहे. वास्तविक आज जगभरातील २५ टक्के शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्मार्टफोनवर बंदी घातली आहे मात्र अजूनही ७५ टक्के शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्मार्टफोन वापरास परवानगी आहे हे देखील सत्य आहे. स्मार्टफोनचा वापर मागील तीन वर्षात कितीतरी पटीने वाढला आहे. पूर्वी मोठ्यांचा हातात दिसणारा स्मार्टफोन आज शाळकरी मुलांच्या हातातही दिसत आहे. कोरोना काळात जेंव्हा शाळा बंद होत्या तेंव्हा स्मार्टफोन हेच शिक्षणाचे एकमेव माध्यम बनले होते.**

त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना मोबाईल विकत घेऊन दिला. कोरोना काळात स्मार्टफोन द्वारे शिक्षक ऑनलाइन अध्यापन करत होते त्यामुळे स्मार्टफोन हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला. कोरोना काळात जरी स्मार्टफोन हे शिक्षणाचे माध्यम बनले असले तरी त्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण हे किती प्रभावी ठरते हे ही जगाने पाहिले. कोरोना काळातच शिक्षकांचे महत्व अधोरेखित झाले. स्मार्टफोन असो की संगणक शिक्षकांची जागा कोणीही घेऊ शकत नाही हेच त्यावेळी सिद्ध झाले. संगणक स्मार्टफोन हे केवळ साधन असून शिक्षकांची बरोबरी करू शकत नाही हे त्यावेळी संपूर्ण जगाने पाहिले. वास्तविक शिक्षणामध्ये संगणक, स्मार्टफोन यांचा चांगला वापर करून घेता येऊ शकतो. संगणक, स्मार्टफोन माहितीचा खजिना उपलब्ध होतो पण प्रत्येक वेळी स्मार्टफोनचा वापर करूनच अध्यापन केले पाहिजे असेही नाही. अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत संगणकाचा, स्मार्टफोनचा अतिरेकी वापर झाला तर अध्ययन - अध्यापन प्रक्रियाच निरस होईल. अध्ययन अध्यापन प्रकियेत आंतरक्रिया खूप महत्वाच्या असतात. विद्यार्थी - शिक्षक, विद्यार्थी- विद्यार्थी, विद्यार्थी - पालक, पालक- शिक्षक या आंतरक्रिया शिक्षण प्रक्रियेत खूप महत्वाच्या असतात. डिजिटल माध्यमात या आंतरक्रियांना वाव नसतो. स्मार्टफोन, संगणक यासारखे डिजिटल माध्यमे कितीही प्रभावशाली असले तरी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात संवाद घडवू शकत नाही म्हणूनच ए आय ( आर्टिफिशल इंटिलीजन्स ) किंवा कोणत्याही डिजिटल तंत्रज्ञानाकडे मानवासाठी सहाय्यक घटक म्हणूनच पाहिले पाहिजे. शाळेत जर डिजिटल माध्यमाचा अधिक वापर झाला तर शैक्षणिक दर्जा ढासळतो हे ही युनेस्कोने आपल्या अहवालात सांगितले आहे. स्मार्टफोनचा जास्त प्रमाणात वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भावनात्मकदृष्ट्या नकारात्मक प्रभाव पडताना दिसत आहे. वर्गामध्ये विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढवायची असेल तर वर्गातून स्मार्टफोनला वर्गातून हद्दपार करावेच लागेल. विद्यार्थी जर वर्गात स्मार्टफोन आणत असेल तर ते सतत स्मार्टफोनवरच व्यस्त



असतात. कोणाचे ऐकत नाही. सतत स्मार्टफोन वापरल्याने विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे व्यसन लागते नव्हे आज अनेक विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे व्यसन लागलेच आहे आणि त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत, आले आहेत. स्मार्टफोनच्या अतिरेकी वापरामुळे अनेक विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक आणि मानसिक समस्या निर्माण झाल्याचे आपण पाहत आहोत. स्मार्टफोनच्या व्यसनामुळे विद्यार्थी एकककोंडे होत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये चिडकेपणा वाढला आहे. मोबाईलचा अतिरेकी वापरामुळे विद्यार्थी हिंसक होत असून स्मार्टफोनच्या अतिरेकी वापरामुळे विद्यार्थ्यांमध्ये लठ्ठपणा वाढला असून विद्यार्थ्यांना लहान वयातच चष्मा लागत आहे. स्नार्टफोनमुळे विद्यार्थी मैदानी खेळ विसरून गेले आहेत एकूणच स्मार्टफोनमुळे विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मानसिक जडणघडण खुंटली आहे. किशोरवयीन मुले तर स्मार्टफोनचा गैरवापर करतानाच आढळतात. कोरोनाकाळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेल्या स्मार्टफोनचा वापर ते गेम खेळणे, व्हिडिओ बनवणे, रिल्स बनवणे, सोशल मीडिया, यु ट्यूब, वेबसिरीज पाहण्यासाठी करतात. एकूणच विद्यार्थ्यांच्या हातात असलेला स्मार्टफोन हा शिक्षणासाठी कमी आणि इतर गोष्टींसाठीच अधिक वापरला जात आहे त्यामुळेच शाळेतून स्नार्टफोन हद्दपार करा ही युनेस्कोची सूचना योग्यच आहे. शाळा, पालक आणि सरकारने याचा गांभीर्याने विचार करावा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत )आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## प्रासंगिक

# सचिन इप्पर यांची जनयोजना पुस्तिका समाजसेवेची नावीन्यपूर्ण संकल्पना

### नाना पटोले व आ. अमित झनक यांच्या हस्ते प्रकाशन



समाजासाठी काहीतरी करावं अशी अनेकांची इच्छा असते.पण त्यांच्यातले काहीजण तन, मन, धनाने उभे राहतात आणि समाजसेवेच्या कार्यात स्वतः ला झोकून देतात. रिसोड तालुक्यातील चिंचाबा ( भर ) येथील एका प्रगतिशील आदर्श कुटुंबातून आलेल्या व कृषी विज्ञान शाखेतून पदवीधर असलेले सचिन तुकाराम इप्पर या २६ वर्षीय तरुणाने सर्वसामान्य गोरगरीब लाभार्थ्यांना उपयुक्त ठरेल अशी, सर्व शासकीय योजना व दाखले यांची माहिती दर्शविणारी ' जनयोजना ' या नावाने एका पुस्तिकेची निर्मिती केली आहे. सदर पुस्तिकेचे प्रकाशन नुकतेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, काँगेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष तथा आ. अमित झनक,आ. वजाहत मिर्झा, दिलीपराव सरनाईक, तातुभाऊ देशमुख, आमानकर साहेब, चक्रधरभाऊ गोटे, शामभाऊ गाभणे, संजय शिंदे, बबनराव गारडे, संदीप घुगे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आहे.



वसंत खडसे
9373578429

बालपणापासूनच सामाजिक कार्याची आवड असलेले सचिन इप्पर यांनी समाजसेवेची व्याप्ती वाढविण्यासाठी राजकीय क्षेत्राची निवड केली. रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांचा 'राजकारणातून समाजकारण ' करण्याचा आदर्श समोर ठेवून त्यांच्याच नेतृत्वात काँगेस पक्षात प्रवेश केला. इप्पर यांची सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी तळमळीने काम करण्याची हातोटी आणि तळागाळातील लोकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहचविण्याची वृत्ती पाहून पक्षश्रेष्ठींनी सचिन इप्पर यांचीअल्पावधीतच युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष पदावर नियुक्ती केली. परिणामी समाजसेवेच्या कार्याची आपसूकच व्याप्ती वाढली. आणि यातूनच इप्पर यांना एक अनोखी अशी नावीन्यपूर्ण संकल्पना सुचली. शासन राबवित असलेल्या श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, विविध प्रकारचे दाखले आणि इतर समाज कल्याण योजनांची माहिती व त्यासाठी लागणारे कागदपत्रे आदी इतंभुत माहिती दर्शविणारे ' जनयोजना ' या माहिती पुस्तिकेची निर्मिती केली. जेणेकरुन सदर पुस्तिकेचा लाभ गरजवंताला घेता येईल व योजना बाबत अनभिज्ञ असलेल्या गोरगरीब जनतेची दलालांपासून होणारी आर्थिक पिळवणूक थांबवता येईल.

ही पुस्तिका सर्वसामान्यांना सहज उपलब्ध व्हावी म्हणून, गावपातळीवर ग्राम पंचायत, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी केंद्र आणि राशन दुकानदार यांच्याकडे मिळण्याची सुविधा असून, सदर पुस्तिका वाचल्या नंतरही लाभार्थ्यांना काही अडचण आल्यास, पुस्तिकेच्या शेवटी अनेक युवक काँग्रेसच्या समाज सेवकांचे संपर्क नंबर दिले आहेत. त्या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन सचिन इप्पर यांनी केले आहे. जनयोजना ही पुस्तिका काही हितशत्रूनां लौकीक अर्थाने फार मोठं काम असल्याचं कदाचित वाटणारही नाही..! पण, गोरगरीब समाज पुढे जाण्याच्या मार्गातील तो खारीचा वाटा खुप महत्त्वाचा ठरणार..! हे मात्र, प्रत्येकाला मान्य करावेच लागेल. सदर प्रकाशन सोहळ्यास अभिषेक देवकाते, सागर भिसडे, नावेद शेख, शैलेश सारसकर, प्रदीप गरकळ, गजानन खडसे, भागेश मुंढे, भूषण बोडखे, विजय दराडे, कार्तिक कोरडे, अमोल थोरवे, विशाल गरकळ आदी जिल्हा व तालुकास्तरीय युवक काँग्रेस पदाधिकारी उपस्थितीत होते.

# पत्रकार अमोल गावंडे यांच्यावर दाखल गुन्ह्यासंदर्भात सखोल चौकशी करा

### टी.व्ही. जर्नालिस्ट संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**खामगाव :** अमोल गावंडे यांचेवर दाखल झालेल्या गुन्ह्या बाबत सखोल चौकशी करण्यात यावी, यासाठी टी.व्ही जर्णालिस्ट संघटणेच्या वतीने १ आँगष्ट रोजी पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना निवेदन देण्यात यावे.याबाबत सविस्तर वृत्त असे की, खामगाव येथील लोकमत डिजिटलचे जिल्हा प्रतिनिधी अमोल गावंडे यांच्यावर काही दिवसापूर्वी पारखेड फाट्यावर काही जणांनी हल्ला करत त्यांना मारहाण केली, त्यांच्याकडील पैसे चोरून नेले व गाडीची ही तोडफोड केली, यासंदर्भात खामगाव शहर पोलीस ठाण्यात त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हे दाखल करून सदर आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, मात्र सदर आरोपींनी अमोल गावंडे यांच्या विरोधात खोटी तक्रार दिली आहे ज्यामध्ये एट्रोसिटी सारखा गंभीर गुन्हा दाखल करतांना उपविभागीय पोलिस अधिकारी हे चौकशी करून गुन्हा दाखल करतात, मात्र इथे कोणतीच चौकशी न करता तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला. पत्रकार अमोल गावंडे यांनी वेळोवेळी सामाजिक हित जोपण्यासाठी जिथे गरज असेल तिथे पोलीस प्रशासना विरुद्ध बातम्या केल्या, कुणी अधीकारी किंवा व्यक्ती विरुद्ध नव्हे तर यंत्रणे विरोधातील ही लढाई आहे, यातून



काही अधिकारी यांनी अमोल गावंडे याना हेतुपरस्परपणे अडकाव्यासाठी क्षडयंत्र रचले आहे का..? अशी दाट शक्यता आहे, तेव्हा हा तपास तात्काळ उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. ठाकरे यांच्या कडून काढून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे द्यावा आणि याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांन कडून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी.

बातम्या करताना नेहमी आमच्या सारख्या पत्रकारांना सतत व्यवस्थे विरोधात लढाव लागत, त्यामुळे काही असामाजिक लोक व्यक्ती विरोधात जाऊन हल्ले करणे, मानसिक त्रास देणे, असे प्रकार राज्यात व जिल्ह्यात विविध घटनाक्रमातून समोर आले आहेत, तेव्हा यापुढे पत्रकारांच्या विरोधात तक्रार आल्यास त्याची निपक्ष चौकशी करून कारवाई व्हावी, अशी मागणी संघटणेच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर निवेदनावर संघटणेचे संस्थापक अध्यक्ष राहूल पहूरकर, कार्याध्यक्ष कासिम शेख, संदीप शुक्ला, संजय जाधव, जीतेंद्र कायस्थ, संदीप वानखडे, वसिम शेख,नितीन कानडजे, अजय राजगुरे,सुनील मोरे, निलेश राऊत शिवाजी भोसले, यांच्या सह्या आहेत. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, जिल्हाधिकारी बुलढाणा यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# कुनो राष्ट्रीय उद्यानात आणखी एका चित्त्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नामिबिया आणि दक्षित आफ्रिकेतून मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात २० चित्ते आणले होते. त्यापैकी आज एका मादी चित्याचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे आतापर्यंत मृत चित्यांची संख्या ६ झाली आहे. टाईम्स नाऊने यासदंर्भातील वृत्त दिले आहे.

आज सकाळी मादी चित्यापैकी एक 'धात्री' चित्ता मृतावस्थेत आढळली. या मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून शवविच्छेदन केले जाणार आहे, असेही अधिकाऱ्याने सांगितले. गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात नामिबिया आणि दक्षित आफ्रिकेतून २० प्रौढ चिते कुनो अभयारण्यात आणण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी चार पिल्लांना जन्म दिला. त्यापैकी आता ६ चित्यांचा मृत्यू झाला आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) असीम श्रीवास्तव यांनी सांगितले की, धात्री असे या मादी चित्त्याचे नाव होते. जंगलात असलेल्या मादींपैकी ती एक होती. कुनो पशुवैद्यक आणि नामिबियाच्या चित्ता तज्ञांचा समावेश असलेल्या वन्यजीव अधिकारी त्यांचा शोध घेत होते.



श्रीवास्तव म्हणाले, आज सकाळी मादी चित्त्यापैकी एक धात्री मृतावस्थेत आढळून आली. मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी, पोस्टमार्टम केले जात आहे. मुख्य वन्यजीव वॉर्डन म्हणाले की कुनो नॅशनल पार्कमध्ये बोमामध्ये १४ चित्ते (७ नर, ६ मादी आणि १ मादी शावक) आहेत आणि कुनो वन्यजीव पशुवैद्य आणि नामिबियातील तज्ञांचा समावेश असलेल्या टीमद्वारे त्यांच्या आरोग्यावर नियमितपणे लक्ष ठेवले जात आहे. द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, वन्यजीव अधिकारी धात्री आणि नीरवा या दोन चित्त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत होते. हे दोन्ही चित्ते जंगली असून ते मानवी संवाद टाळतात. त्यामुळे त्यांना पिंजऱ्यात ठेवणे कठीण होते.


# यश मिळविण्यासाठी संकटांनाच संधी माना

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** मुलांनी विद्यार्थीदशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उत्तुंग ध्येय समोर ठेवले पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नातील सातत्य कायम ठेवून त्या ध्येयाचा पाठलाग करायला हवा. मनातील न्यूनगंड बाजूला सारून सक्षमपणे येणाऱ्या संकटांना सामोरे गेले पाहिजे. जीवनात संकट ही कधीच अडवायला येत नाहीत तर ती आपणाला घडवायला येतात.त्यामुळे पुढे जाण्यासाठी संकटांना संधी मानून काम केले तर तुम्ही यशाच्या शिखरावर निश्चित पोहचाल असा विश्वास खंडाळा येथील प्रसिद्ध वक्ते इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांनी व्यक्त केला. कोडोली सातारा येथील ज्ञानसाधना कोचिंग क्लासमध्ये 'आजचा तरुण - आव्हाने आणि यश ' या विषयावर ते बोलत होते. यावेळी कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव , संचालिका चारुशीला जाधव , कृष्णा तिकोणे यासह प्रमुख उपस्थित होते.इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे पुढे म्हणाले , राजमाता जिजाऊंनी स्वराज्याचे पाहिलेले स्वप्न छत्रपती शिवाजी महाराजांनी पूर्ण केले. तसेच आपल्या मुलाने उत्तुंग यश मिळवावे हे स्वप्न प्रत्येक आईवडिलांचे असते. ते स्वप्न सत्यात उतरविण्याची जबाबदारी मुलांची आहे.शालेय वयात अभ्यासातील सातत्य ठेवून प्रत्येक विषयाच्या मूळाशी पोहचून आकलनपूर्वक अभ्यास केला तर अपयशाला सामोरे जावे लागणार नाही. मात्र त्यासाठी प्रयत्न महत्वाचे आहेत कारण यश मिळविण्यासाठी कोणताही जवळचा मार्ग नसतो.

महाराष्ट्र Business Katta










# राजे लखुजीराव जाधव यांच्या एका शाखेतील एक नवीन अप्रकाशित शिलालेख !


आधुनिक केसरी

**तुकाई देवी मंदिर शिलालेख घनसावंगी : हा शिलालेख जालना जिल्ह्यातील घनसावंगी (अंबड) तालुक्यातील कसबे घनसावंगी गावी येथील गावा पासून १ किमी अंतरावरील मेन विद्युत सब स्टेशन शेजारी जाधवराव देशमुख घराण्याचे कुळदैवत असलेल्या रेणुकादेवी व तुकाई देवी मंदिराच्या परिसरात सापडला आहे.मंदिर सध्या पूर्ण जीर्णोधारित असून पूर्ण पणे नवीन बांधकाम केलेले आहे सध्या तो राज देशमुख जाधवराव यांच्या वाड्यात ठेवला आहे शिलालेखा ची शीळा ही आयताकृती असून ती मंदिरच्या मुख्य गाभाऱ्यावर असावी, एकंदरीत रचना पाहता शिळा मोठी असावी पण सध्या तिचा अर्धा भाग तुटून गहाळ आहे.**












सुरुवातीचा अर्धा मजकूर गहाळ असल्यामुळे पूर्ण लेख समजून येत नाही , शिलालेख कोरीव स्वरूपाचा असून ३ ओळीचा अशुद्ध देवनागरी लिपीत मराठी बाळबोध भाषेत आहे .शिलालेखाची अक्षरे ठळक खोलगट असून शेवटचा भागातील पूर्ण झिजला आहे असून अक्षरे सुस्पष्ट पणे सहज वाचता येत नाहीत. गावाचे नाव : मु पो घनसावंगी ,ता. घनसावंगी ( अंबड ), जि. जालना

शिलालेखाचे वाचन : १. {नीळ } कंठ राजे जाधवराव

२.रतळ नाम तुकाई वतन जागीर पुडरे x

३.जपदान वाक न न क जान जी.पी.एस. :-१९.५१ "४४'५७ ,७५ .९९ ''००.'७८ शिलालेखाचे स्थान :- मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या आडव्या तूळईवर कोरलेला असावा . अक्षरपद्धती : कोरीव स्वरूपाचा लेख आहे. भाषा : अशुद्ध मराठी बाळबोध मिश्र स्वरूप देवनागरी प्रयोजन : मंदिर ठिकाणास जहागीर वतन दिल्याची स्मृती जपणे. मिती / वर्ष : -अंदाजे १७२५ –( पत्रावरील नोंदीनुसार ) काळ वर्ष : साधारण अठरावे शतक कारकीर्द :- थोरले शाहू महाराज व्यक्तिनामः-नीलकंठ जाधवराव शिलालेखाचे वाचक : श्री विक्रांत मंडपे ,श्री अनिल दुधाने प्रकाशक : संक्षेप :- जागीर –जहागीर संदर्भः- अर्थ :- तुकाई माता चरणी तत्पर असलेले राजे नीलकंठ जाधवराव यांनी आपले कुळदेवता रेणुका माता व तुकाई माता हिचे मंदिर बांधलेले असून त्या मंदिरास काही जहागीर व वतन दिलेले आहे. असा उल्लेख शिलालेखात आहे. शिलालेखाचे महत्व.

सिंदखेड राजा येथील मुख्य शाखेतील एक शाखा पुढे घनसावंगी येथे विस्थापित झालेली दिसते. मराठेशाहीच्या कारकिर्दीत नीलकंठ राव जाधवराव यांनी घनसावंगी येथे एक मंदिर स्थापन केले .मंदिरावर असलेला शिलालेख हा मंदिराचे बांधकाम केल्याच्या संबधित असून पुढे त्या मंदिराच्या पूजे अर्चा करिता काही जमीन जहागीर किवा वतन दिलेले आहे. जाधवराव घराण्यातील कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा हा शिलालेख आहे यावरून जाधवराव घराणे हे आपल्या पुर्वाजाप्रमाणे सामाजिक व धार्मिक ,अध्यात्मिक कार्यात अग्रेसर होते हे सिद्ध होते .एका कर्तबगार व्यक्तीने मंदिरासारखे सारखे बांधकाम करून जन सामान्यासाठी धार्मिक व सामाजिक कार्य करून शिलालेखाच्या स्वरुपात कोरून लोकाच्या नजरेसमोर कायमचे ठेवले हेच या शिलालेखाचे विशेष महत्व आहे .

**घनसावंगी येथील जाधवराव घराणे माहिती :-**

१.शाहू दफ्तरातील १७२५ -२६ च्या पत्रानुसार राजेश्री नीलकंठ राव जाधवराव यास नवाब निजामाने कैदेत ठेवलेली नोंद मिळते यानुसार शाहू महाराजांच्या आज्ञे नुसार पिलाजी जाधवराव नेमके त्या प्रांती आहेत यास पत्र पाठवले आहे कि तुम्ही नीलकंठ जाधवराव यास निजामाच्या कैदेतून मुक्त करावे.

२.शाहू दफ्तरातील अंक ५ पुडका १ च्या नोंदी नुसार नीलकंठ राव जाधवराव व त्याच्या भाऊ बंदामधील वतना संबधी कजिया बाबतचे पत्र दिल्याची नोंद आहे.

३.घनसावंगी उर्फ धनसावंगी हे एक कसब्याचे गाव आहे .येथील राजे नीलकंठराव जाधवराव देशमुख यांच्या वतनातील अनेक गावांपैकी गुरु पिंपरी हे एक गाव आहे .येथे राजेकवराजी जाधवराव. यांच्यापर्यंत देशमुखी वतन असणारी गावे गुरुपिंपरी, मांदळाजहागीर बोलेगाव, मंगूजळगाव ,राजेगाव तसेच घनसावंगी उर्फ धनसावंगी येथील पाटीलकी व देशमुखी जाधवराव घराण्याकडे आहे जाधवराव घराण्यातील काही व्यक्तींच्या समाध्या गुरुपिंपरी व धनसावंगी येथे आढळतात.

४..महानुभव पंथातील हस्तलिखितपोथी मध्ये शके १६९० म्हणजेच सन १७६८ मध्ये जाधवराव घराण्याची पूर्वजांची यदुवंशीय भानुवंशी / यदुवंशी राजे जाधव धनसावंगी अशी नोंद असून त्यांची स्वताची गढी आहे आजही गढी चे बहुतांशी अवशेष शिल्लक आहेत. ५..राजेलखुजी जाधवराव यांच्याकडे पन्नास हजार मनसपदारी असताना घनसावंगी या भागातील त्या काळापासून जाधवराव घराण्याकडे वंशपरंपारिक देशमुखी पाटीलकी होती त्यांच्या पुढील पिढीतील राजेकवराजी जाधवराव यांच्या नावे अंदाजे पाचशे ते सहाशे एकरच्या जमिनीच्या नोंदी मिळतात

६.आजपासून सन १८६०पर्यत च्या महसुली नोंदी व वंशावळीतील नावे मिळालेली असून राज जाधवराव देशमुख यांच्या संग्रही असलेल्या वंशावळी शी तंतोतंत जुळते. त्यापूर्वी असलेल्या वंशवळी वर अधिक संशोधन चालू आहे.

**निष्कर्ष :-**घनसावंगी येथील देशमुख हे जाधवराव देशमुख असून नीलकंठ राव जाधवराव यांचे वंशज असून ते जाधवराव घराण्यातील नेमके कोणत्या वंशज शाखेतील आहेत यावरपुढील संशोधन कार्य चालू आहे. जाधवराव घराण्याचे वंशज आज देऊळगाव राजा, आडगाव राजा, किनगाव राजा, जवळखेड,उमरद देशमुख व मेहुणा राजा तसेच सिंदखेडराजा परिसराबाहेर माळेगांव बुद्रुक येथे तीन वंशजशाखा आहेत त्या अनुक्रमे सरसेनापती धनाजीराव जाधवराव यांच्या दोन व पैठणकर जाधवराव यांची एक, बोरगाव ,मांडवे ( सातारा ), भुईंज, करवंड, करणखेड, सारवडी, तेल्हारा,वडाळी,वाघोली, वाडी, पुणे भागात नांदेड,अक्कलकोट,कुंभारगाव, पाटेवडी व भुम,आणि धनसावांगी इत्यादी ठिकाणी राहतात आणि ते मोठया अभिमानाने आपला वारसा तसेच त्यांचे विचार अंगिकारून समाजकार्यात भाग घेत असल्याचे दिसून येते.

**©माहिती व संकलन :-श्री अनिल दुधाने . सदर कार्यात श्री राजेनरेश जाधवराव ,श्री राज देशमुख जाधवराव ,श्री राम भाऊ लांडे ,advocate वाघदरे यांचे सहकार्य लाभले**

# पडका भिडेवाडा; मोदींच्या स्वागतास खोडा!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**पुण्यातील बुधवार पेठेत असलेल्या भिडेवाड्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. सन १८४८ मध्ये सावित्रीबाई फुले यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा इथेच स्थापन केली होती. या जुन्या वस्तूच्या दुरूस्तीकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. दि.१ जानेवारी १८४८ रोजी सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती आणि थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या मदतीने बुधवार पेठेतील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. हा वाडा पुण्याच्या जुन्या वाडा संस्कृतीतील अनेक पारंपरिक घरांपैकी एक आहे.**

१८व्या शतकात पुणे ही पेशव्यांची राजधानी असताना या वास्तू बांधल्या गेल्या होत्या. त्यातील बहुतेक वैशिष्ट्यपूर्ण वाडे दोन मजली उंच आणि आयताकृती मांडणीचे होते. या वाड्याच्या मध्यभागी आठ खोल्या, एक विहीर आणि शौचालयाची सुविधा होती. त्यांच्या एकत्र कुटुंबातील बरेच सदस्य आणि अगदी जवळचे मित्र या वाड्यात राहायचे. हा वाडा पेशवाईच्या काळात शासकवर्गाच्या सदस्यांसाठी, तसेच उच्च वर्गाच्या नागरिकांसाठीही निवासव्यवस्था म्हणून वापरला जात असे. भिडेवाड्याच्या अंगणातूनच अनेक सामाजिक चळवळी सुरू झाल्या होत्या. आज मंगळवार दि.१ ऑगस्ट २०२३ रोजी माझ्या महान भारतदेशाचे सर्वेसर्वा पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी महाराष्ट्राची सांस्कृतिक पंढरी- शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहराच्या दौऱ्यावर आले. तेव्हा ही अगदी मोडकळीस आलेली ऐतिहासिक वास्तू अर्थात बहुजन समाजास शैक्षणिक महत्त्व, न्याय व हक्क दाता भिडेवाडा भल्या मोठ्या व महागड्या पडद्याने झाकला गेला. स्वागत समारंभाच्या शानदार सजावटीस तो बाधक व कलंक ठरू नये म्हणून...! यातरी मिसाने त्याची थोडी थोडकी डागडुजी होणे अगत्याचे असतानाच प्रसंगावधान साधून 'गु' झाकल्यासारखी कृती करण्यात आली, ती अगदी ज्ञानी-गुणी जनांच्या दृष्टीने निषेधार्हच! ती एक घाण नसून स्वयं प्रकाशक ज्ञानाची साक्ष आहे, हे या बांडगुळांना कोणी कसे सांगावे ? असा खरमरीत लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखणीतून, जरुर वाचा... संपादक._

भिडेवाड्यात शाळेची स्थापना करणाऱ्या सावित्रीबाई फुले नऊ वर्षांच्या असताना त्यांचे १३ वर्षांच्या ज्योतिराव फुले यांच्याशी लग्न झाले होते. माळी जातीतील असल्याने त्यांना मागासवर्गीय म्हणून हिणवले जात होते. त्यांना सामाजिक किंवा शैक्षणिकदृष्ट्याही वंचित ठेवले जाई. सावित्रीबाईंनाही केवळ स्त्री असल्यामुळे नाही, तर जातीपातीमुळेदेखील औपचारिक शिक्षण नाकारले गेले. घरी शिक्षण देणाऱ्या त्यांच्या पतीकडून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर त्या स्वतःच शिक्षिका बनल्या. शिक्षिका आणि नंतर मुख्याध्यापिका होणारी ती पहिली भारतीय महिला होती. सावित्रीमाईसोबत फातिमा शेख यांनी सुद्धा बहुजनांच्या मुलांना बालविद्या शिकविण्यात कमी पडल्या नाहीत.

स्वदेशी ग्रंथालय किंवा भिडे शाळा म्हणून ओळखली गेलेली ही शाळा उघडणे, त्याकाळी बऱ्याच अर्थाने क्रांतिकारी कार्य होते. त्या काळाच्या सामाजिक व्यवस्थेला आव्हान देणारे होते. त्याकाळी शिक्षण ब्राह्मण जातीपुरतेच मर्यादित होते. त्यामुळे शिक्षण आणि शाळा सुरू करणे या दोन्ही गोष्टी क्रांतिकारी होत्या. त्यात ब्राह्मण शिक्षकांनी हा अभ्यासक्रम शिकवण्यास नकार दिला. या अभ्यासक्रमात वेद आणि शास्त्र यांसारख्या धार्मिक ग्रंथांच्या अध्यापनाची जागा गणित, विज्ञान आणि सामाजिक विज्ञान यांसारख्या वैज्ञानिक विषयांनी घेतली. शिक्षणसम्राट महात्मा फुले यांची शिकवण्याची पद्धत इतकी लोकप्रिय झाली की, त्यांनी ज्या शाळांमध्ये प्रवेश केला, तेथील सरकारी शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांपेक्षा मुलींची आकडेवारी जास्त नोंदविली गेली. मात्र, या दाम्पत्याला त्यांचे कुटुंब आणि समाज यांनी वाळीत टाकले, बहिष्कृत केले. सावित्रीबाई फुले यांना शाळेत जाताना एक साडी जास्त घेऊन जावी लागे, कारण रस्त्यात लोक त्यांच्यावर दगडफेक करत, शेण फेकत असत. या तरुण जोडप्याला सन १८४९



मध्ये त्यांच्या घरच्यांनीही खालच्या जातीला शिक्षण देत असल्याच्या कारणाने घराबाहेर काढले. मात्र, फातिमाई शेख आणि त्यांचा भाऊ उस्मान यांनी फुले यांचे त्यांच्या घरी स्वागत केले. पुढे १९व्या शतकातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका म्हणून याच फातिमाई शेख यांचे नाव नोंदले गेले. महिलांना सुशिक्षित करण्याच्या प्रयत्नात त्यांनी सावित्रीबाईंना मोलाची साथ दिली.

सद्या जीर्ण अवस्थेत असलेला हा भिडेवाडा भाडेकरूंच्या हक्कांबाबतची लढाई लढतो आहे. सन १९९०च्या दरम्यान तो पुणे मर्चंट्स को. ऑप. बँकेकडे तारण ठेवण्यात आला आणि शेवटी २००० मध्ये मंत्री किशोर असोसिएट्सला विकला गेला. त्यावर्षी पुणे महानगरपालिकेच्या कार्यालयाबाहेर सुमारे ५०० अंगणवाडी शिक्षिकांनी जोरदार निदर्शने केली होती. सन २०१७मध्ये शाळेला राष्ट्रीय वारसा दर्जा देण्यासाठी, तसेच वाड्याला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याच्या मागणीसाठी ३०० हून अधिक जणांनी मानवी श्रृंखला बनविली होती. दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने त्या जागेवर ग्रंथालय बनविण्याचा आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारण्याचा प्रस्तावही ठेवला आहे. या व्यतिरिक्त "भिडे वाडा वाचवा! मोहीम सुरू झाली असून, सरकारला हे राष्ट्रीय स्मारक करण्याचे आवाहन केले जात आहे. तरीही सरकार कानात बोळे आणि डोळ्यांसमोर असे महागडे पडदे उभारून दिमाखात मिरवित आहे, लाखमोलाचा नुसताच! पुणे महानगरपालिकेने वाडा पूर्ववत करण्याचे आश्वासन देऊनही या जागेकडे दुर्लक्ष केले आहे. फुले यांची दोन छायाचित्रे असलेला नीलफलक आणि इमारतीच्या महत्त्वाचे थोडक्यात वर्णन एवढीच काय ती वाड्याच्या वारशाची चिन्हे आहेत. आज मंगळवार दि.१ ऑगस्ट २०२३ रोजी माझ्या महान भारतदेशाचे सर्वेसर्वा पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी महाराष्ट्राची सांस्कृतिक पंढरी- शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहराच्या दौऱ्यावर आले. तेव्हा ही अगदी मोडकळीस आलेली ऐतिहासिक वास्तू अर्थात बहुजन समाजास शैक्षणिक महत्त्व, न्याय व हक्क दाता भिडेवाडा भल्या मोठ्या व महागड्या पडद्याने झाकला गेला. स्वागत समारंभाच्या शानदार सजावटीस तो बाधक व कलंक ठरू नये म्हणून...! यातरी मिसाने त्याची थोडी थोडकी डागडुजी होणे अगत्याचे असतानाच प्रसंगावधान साधून 'गु' झाकल्यासारखी कृती करण्यात आली, ती अगदी ज्ञानी-गुणी जनांच्या दृष्टीने निषेधार्हच! ती एक घाण नसून स्वयं प्रकाशक ज्ञानाची साक्ष आहे, हे या बांडगुळांना कोणी कसे सांगावे ? सत्ताधारी पुढाऱ्यांच्या अशा असंवेदनशील पणाने व रेंगाळी स्वभावामुळेच अशी दैनावस्था झाली आहे. असो, पण जगात भारी म्हणून मिरविणारे देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी साहेबांनी दगडुशेठ हलवाई गणेशदर्शन केले, मोठाल्या शैक्षणिक संस्थामध्ये उतरले, थांबले व विश्राम फर्मावले, मात्र तेथील लगतच्या या जगप्रसिद्ध शैक्षणिक आणि ऐतिहासिक वास्तुच्या धावत्या भेटीची- पाहणीची त्यांना साधी इच्छा होऊ नये, हेच किती दुर्भाग्यपूर्ण! नाही का ?

# वाचाळवीरांचा सरदार कोण ?




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**पुरोगामी महाराष्ट्रात तर्कहीन, द्वेषाने भरबटलेले, आणि विषमतेची घाण डोक्यात असणाऱ्या, वाचाळविरांची संख्या कमी नाही. मेंदुचा वापर समाजात शांतता व सुव्यवस्था बिघडवण्यासाठी जास्त प्रमाणात करून धर्माला व सत्तेला ढाल बनवले जाते हि गोष्ट सामाजिक न्याय, समता व देशाच्या विकासाला घातक आहे. ज्या लोकांना माणसासोबत कसे रहावे, ज्यांच्या नावात, शिक्षणात काळाबाजार आहे. अशा लोकांना विद्वान, आदर्श मानुन शासकीय व जनतेची जबाबदारी असलेले लोक त्यांच्या समोर झुकतात तेव्हा झुकणाऱ्याच्या बुद्धीची किव तर येतेच लोकशाही, नितीमत्ता व विद्वता धोक्यात आहे याची खंत वाटते. आपण महालराष्ट्राचा जरी विचार केला तरीही आपल्याला प्रत्येक ठिकाणी सत्तेच्या आर्शिवादाने विषमता, व अन्याय दिसून येतो.**

यात नवीन असे काही नाही संपूर्ण महाराष्ट्राला याची जाणीव आहे. धर्माचा आधार घेऊन इतरां बद्दल चुकिचे व वादग्रस्त विधाने करून जनतेचे लक्ष मुळ समस्येवरून बाजूला सारून धर्माच्या व धर्माला पोषक असणाऱ्या वाचाळविरांना येथे संरक्षण दिले जाते. आपण अनेक घटना बघितल्या तर आपल्या लक्षात येते कि येथे विषमता व द्वेष कशा पद्धतीने मजबूत करून विकृत लोकांना मोठे केले जात आहे. एखादी घटना, गुन्हा घडल्यानंतर त्या घटनेतील गुन्हेगाराची जात शोधली जाते. आणि जर आरोपी मुस्लिम असेल तर लहान गोष्टही भावनिक तिव्रतेने मोठी केली जाते. ठिकठिकाणी आंदोलन, मोर्चे, मुस्लिम विरोधी विधाने केले जातात. आणि यामध्ये महाराष्ट्राचे गृहमंत्री सुद्धां मागे राहत नाही. चुकीच्या व देशाच्या हितविरोधी बाबींसाठी सर्वांनी आक्रमक पणे उभे राहुन देशाचे हित, जनकल्याण व शांतता सुव्यवस्था बघने प्रत्येकांचे कर्तव्य आहे. परंतु मुस्लिम आरोपी असेल तर प्रत्येक बाबींची तिव्रता जास्त असते. आरोपी ला तात्काळ अटक केली जाते. परंतु जेव्हा आरोपी हा मुस्लिम नसुन तो हिंदुत्ववादी संघटनेशी, सत्तेशी संबधीत असतो तेव्हा मात्र गुन्हा कितीही गंभीर असला तरीही त्याला तात्काळ अटक होत नाही, आंदोलन, मोर्चे निघत नाहीत, उलटपक्षी आम्ही घटनेची शहानिशा करून योग्य ती कार्यवाही करू असे बोलून गृहमंत्री गंभीर बाबही अगदी किरकोळ करून गंभीर बाबींच्या आरोपींना पाठीशी घातले जाते. आणि जेव्हा सर्व सामान्य जनता वेगवेगळ्या माध्यमातून व्यक्त व्हायला लागतात तेव्हा गृहमंत्री साहेबांच खाते सोशल मिडीयावर कोणत्याही व्यक्ती, धर्म जात किंवा द्वेष पसरवणाऱ्या बाबी शेअर करू नये आणि तसे केल्यास त्यांच्या वर गुन्हे दाखल करण्यात येतील असे पत्र, आदेश काढतात आणि सोशल मिडीयावर मत व्यक्त केल्याने अनेक तरुणांवर गुन्हे दाखल झाल्याचेही उदाहरणे आहेत. मग मुळ मुद्दा हा येतो. मुस्लिम आरोपींना कोणतीही शहानिशा न करता तात्काळ अटक व हिंदुत्ववादी संघटनेशी संबधित लोकांना सरकार च क्लिन चिट देत असेल तर हा जातीवाद, धर्म वाद, विषमता पसरवणारे कृत्य नाही का ? हिंदुत्ववादी संघटनेशी संबधीत विकृत माणसिकतेचे अनेक मनोरुग्ण आज समाजामध्ये फिरून चुकिचा इतिहास सांगत आहेत, राष्ट्र व राष्ट्रीय प्रतिकांचा अवमान करत आहेत. स्वातंत्र्य सेनानी व महापुरुषांबद्दल चुकिचे विधाने करणारे मनोरुग्ण बाहेर फिरुन सामाजिक वातावरण दुषीत करत असताना, त्यांना थांबवने, त्यांच्या वर बंधने घालुन शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हे सरकारचे काम आहे. मनोरुग्ण व विकृत व्यक्तीला बाहेर फिरू देऊ नका, विकृती पसरवून समाजातील तरुणांची दिशाभूल करणाऱ्यांना आवरण्याची विनंती लोक सरकार ला करतात तरीही सरकार विकृत लोकांवर आळा घालत नाही. आणि समाजात चुकिचा इतिहास पसरू नये, राष्ट्र व राष्ट्राच्या प्रतिकांचा अवमान होऊन नये म्हणून संविधानीक मार्गाने विकृतींना थांबण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा सर्व सामान्य लोकांवर गुन्हे दाखल केले जातात. आणि विकृतींना मोकाट फिरू दिले जाते यालाच निरपेक्ष व पारदर्शक सरकार म्हणायचे का ? मनोहर कुलकर्णी नावाचा वयोवृध्द विकृत मनोरुग्ण, देशाचे स्वातंत्र्य, देशाचा ध्वज, राष्ट्रगीत मान्य करत नाही अशा व्यक्तीचे नागरिकत्व रद्द करून तुरुंगात डांबुन ठेवायला पाहिजे तर देश विरोधी वक्तव्य करणाऱ्या विकृतींना सरकार संरक्षण देते. कशामुळे तर तो केवळ हिंदुत्ववादी पुरस्कार करतो म्हणून. मनोहर कुलकर्णी च्या जागेवर जर एखादा मुस्लिम असता तर सरकार, गृहमंत्री व भक्त खरचं एवढे शांत बसले असते का ? मनोहर कुलकर्णी गांधीच्या वडीलांवर वादग्रस्त वक्तव्य करून त्यांना चोर म्हणतो, देशाच्या माजी प्रधानमंत्र्यांना तो अकार्यक्षम म्हणतो, गृहमंत्र्यांना या बाबीब त्यांच्या विभागाकडून कोणतीही माहिती नसेल मिळाली पण सर्वसामान्य लोक एवढ्याप्रमाणात निवेदने देऊन त्या विकृत मनोरुग्णाला अटक करावी याची मागणी करतात पण सरकार काहीच गांभीर्याने घेत नाही. सरकार गांभीर्याने घेत नाही म्हणून जनता सोशल मिडीयावर व्यक्त होते. मात्र अशा बाबतीत व्यक्त होताना कोणाच्याही वैयक्तिक भावना व धर्म द्वेष होईल अस वक्तव्य व लिखाण करू नका असे आदेश दिले जातात. परंतु लोकांना धर्म जात व्यक्ती यावर वैयक्तिक मत मांडण्याची परिस्थिती च सरकारने निर्माण होऊ देऊ नये. यासाठी मात्र सरकार काहीच करत नाही. मनोरुग्ण कुलकर्णी यांचा आणि जनतेचा वैयक्तिक असे वाद कोणतेच नाहीत परंतु तो चुकिचे विचार सांगून राष्ट्र व राष्ट्रीय सन्मानाच्या विरोधात वागत असताना लाखों लोकांना आदेश दिल्यापेक्षा एका मनोरुग्णाला अटक केली तर लोकांना मत व्यक्त



करण्याची गरजच नाही. परंतु मनोरुग्णाला अटक न करता सर्वसामान्य लोकांवर गुन्हे दाखल केले जातात तर धर्मवाद, जातीवाद व विषमता पसरवणारे कृत्य नाही का ? आमचे गृहमंत्री स्वराजाचे शत्रु औरंजेब यांना औरंग्या म्हणतात. शत्रुचाही सन्मान करावे ही आमच्या शिवबाची शिकवण असताना त्याच शिवबाचे नाव घेऊन औरंजेबाला ते औरंग्या म्हणतात. कारण काय तर ते स्वराज्याचे शत्रु होते. आता मुळ प्रश्न हा आहे की स्वराज्याचा आज शत्रु कोणाला म्हणायचे ? जे विदेशी आहेत त्यांना ? जे मुस्लिम आहेत त्यांना ? की जे देशात राहुन देश विरोधी कृत्य करत करतात त्यांना ? देशात राहुन देशाची घटना, राष्ट्र, राष्ट्रीय प्रतिके, राष्ट्रगीत, व महापुरुषांचा अवमान करणारा खरा शत्रु होय. मग औरगंजेबाला ज्या तिव्रतेने गृहमंत्री साहेबांनी औरंग्या म्हणले होते त्याच तिव्रतेने ते मनोहर कुलकर्णी यांना ते मन्या म्हणतील का ? कारण मनोहर कुलकर्णी देखील आज राष्ट्रद्रोह करत आहे. औरंगजेब हा शत्रु होता म्हणून विरोध आहे की मुस्लिम होता म्हणून विरोध आहे. शत्रु होता म्हणून विरोध असेल तर फडणवीस साहेबांनी मनोहर कुलकर्णी यांनाही विरोध करावा, आणि जर मुस्लिम होता म्हणून औरंगजेब ला विरोध होत असेल तर फडणवीस साहेब धार्मिक द्वेष पसरवतात म्हणून गुन्हा दाखल का होऊ नये ? सत्य बोलले तर धर्म, जात व्यक्ती यांची बदनामी होते अस गृहमंत्री यांच्या बोलण्याचा अर्थ निघतो परंतु गृहमंत्री यांचे कृत्य निरपेक्ष आहे का हा सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे.

तिकडे तो दुसरा मनोविकृत मनोरुग्ण शरद पोंक्षे म्हणतो आरक्षण आणि कोणतीही सवलत नसताना माझी मुलगी वैमानिक झाली. मुलगी वैमानिक झाली या मागे सावित्रीमाई फुले व भारतीय संविधान खंबीरपणे उभे आहे. आणि मुलगी वैमानिक झाली हे याचा अभिमान सर्वांना आहे. परंतु शरद पोक्षे आरक्षणा बद्दल चुकिचे विधान करतो आणि सरकार त्यावर कोणतीही कारवाई करत नाही.

मग वैचारिक पद्धतीने जर पोक्षेला उत्तर दिले तर जातीवाद होतो. हजारो वर्षांपासून शिक्षणावर एकाधिकार हा ब्राम्हणांचा होता. म्हणून ब्राह्मण न्याय व नितीवान आणि समतावादी नसल्याने त्यांनी त्यांच्या घरातील महिलांना सुद्धां शिक्षणाचा गंधही लागु दिला नाही अथवा कोणत्याही ब्राम्हणाने महिलांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला नाही. इंग्रज भारतात आले त्यांनी शिक्षणाची सुरवात केली, सावित्रीमाई व जोतीबा यांनी जेव्हा मुलींना शिक्षण सुरू केले तेव्हा विरोध करणारे ब्राम्हणच होते. मुलीला शिकवले तर धर्म बुडतो असे सांगुन महिलांचे शिक्षण नाकारणारे ब्राम्हण आणि विरोधाला न जुमानता महिलांना शिक्षण देणारे सावित्रीमाई व जोतिबा फुले यामध्ये फुले दांपत्य. याच दांपत्यामुळे महिलांना शिक्षणाची संधी निर्माण झाली. पुढे बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय घटनेमध्ये लिंगभेदाचा विरोध न करता प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार मिळवून देऊन त्या अधिकाराचे संरक्षण केले. परंतु एवढा इतिहास कळेल एवढा विद्वान शरद पोक्षे नाही. आणि आरक्षण म्हणजे सवलत नाही नाही तर संधी आहे. ब्राम्हणांनी हजारो वर्षांपासून माणसाला माणसाजवळ येऊ दिले नाही, शिक्षण, उद्योग यापासून कोसो दुर ठेवले, ते सर्व संविधानाने हानुन पाडून सर्वांना समान केले. ब्राह्मण जातीवाद करतात आणि ते इतरांना आपल्या बरोबरीने येऊ देत नाही. म्हणून त्यांच्या बरोबरीने जाण्यासाठी आरक्षण आहे. आजही ब्राम्हणाकडे न्याय व समता नाही. जर तसे असते तर मंदिरात आरक्षण नाही तर ब्राम्हणेत्तर लोक पुजारी सोडा गाभाऱ्यात जाऊ शकत नाहीत. ब्राम्हणेत्तर लोक सोडा ब्राम्हणांच्या महिला पुजारी होऊ शकत नाहीत कारण त्यांचा धर्म त्यांना होऊ देत नाही. परंतु ब्राम्हण असो वा आदिवासी प्रत्येकाला कोणत्याही शासकीय व सार्वजनिक पदावर जावे लागते ही देण फक्त भारतीय संविधानाची आहे. आणि महिला शिक्षण घेतात या मागे सावित्रीमाईचा त्याग आहे हे पोक्षे जाणीव पुर्वक बोलत नाहीत कारण डोक्यात व कृतीत केवळ विषमता आणि द्वेष आहे. पोक्षे कडे थोडासा जरी प्रामाणिक पणा असता तर त्याने सांगितले असते आमच्या कडे हजारो वर्षांपासून शिक्षण होते पण आम्ही महीलांना शिकवू शकलो नाही. आजही आमच्या ताब्यात मंदीरे आहेत पण महिलांना पुजारी बनवू शकलो नाही फक्त सावित्रीमाईच्या त्यागाचे व बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने माझी मुलगी वैमानिक बनली. कारण सत्य बोलायला नितीमत्ता लागते आणि तिच नितीमत्ता पोक्षे, मनोहर कुलकर्णी अशा लोकांकडे नाही. परंतु अशा मनोरुग्ण लोकांना पाठीशी घालून, त्यांना संरक्षण देऊन आणि त्यांच्या विरोधात पण सत्य बोलणाऱ्या वर गुन्हे दाखल केले जात असतील तर याचा सरळ सरळ अर्थ आहे वाचाळविरांना व मनोरुग्णाना सरकारच पाठीशी घालून समाजात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून लोकांचे लक्ष मुळ समस्येपासून दुर करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु घोटाळेबाज लोकांच्या हाती अर्थखाते, पैशाचा जोरावर आमदार ची बोली, महागाई, बेरोजगारी, आरोग्य सुविधा, निकृष्ट दर्जाचे काम व करोडोचे घोटाळे, जळते मनीपुर, नग्न महिलांची धिंड अशा अनेक समस्या सर्वसामान्य जनता कधीच विसरु शकत नाही. सरकारने कितीही वाचाळविर व मनोरुग्णाच्या माध्यमातून सामाजिक शांतता व सुव्यवस्थेचा निर्माण होण्यासाठी प्रयत्न केला तरीही आता लोक जागृत झाले आहेत. आणि वाचाळविरांचा व मनोरुग्णाचा सरदार कोण हे याची ओळख जनतेला झाली आहे. परंतु सरकार ने केलेल्या विषमता, धर्मद्वेष, व्यक्तीद्वेष, व पक्षपाती पणाचे कृत्य हे देखील शिक्षेस पात्र आहे. हाती सत्ता आहे म्हणून सत्तेचा गैरवापर करू नये हे नितीमत्येचे लक्षण आहे.

# परीक्षार्थींची अर्थिक लूट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सरकार शासकीय सेवेत अनेक पदांची भरती करत असते. सरकार एखाद्या कंपनीच्या माध्यमातून पद भरती करत असते. स्पर्धा परीक्षा किंवा योग्यता परीक्षेसाठी प्रती उमेद वारांकडून शुल्क आकारत असते. हा महसुल कोट्यावधी रुपयात जमा होत असतो.**



खर तर पद भरतीसाठी जो शुल्क आकारला जातो तो जास्त असतो. तितका खर्च येत नसतो. मात्र सरकार शुल्काच्या नावावर कोट्यावधी रुपय जमा करून परीक्षार्थींची आर्थिक लूट करत आहे. है एक प्रकारचे आर्थिक शोषण आहे. प्रत्येक परीक्षार्थीला साधारणता १० ते १५ हजार रुपये विविध पदांचे अर्ज भरण्यासाठी लागतात. परीक्षा देणारा विद्यार्थी हा आधीच बेरोजगारीने त्रस्त आहे व उपरोक्त खर्च त्यास पेलवणारा नाही. सध्या महागाईने कळस घाठला आहे पूर्ण राज्यात ओल्या दुष्काळाची परिस्थिती आहे.

यातील बरेच विध्यार्थी हे शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील आहे व आधीच कुटुंबावर दुबार पेरणीचे संकट आहे. त्यात हे परीक्षा शुल्क निश्चितच न परवडणारे आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील १० ते १५ लाख विध्यार्थ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. तलाठी भरतीत ११ लाख अर्ज आलेत त्याचा महसूल सरकारच्या तिजोरीत १२७ कोटीचा महसूल जमा झाला.ही एक प्रकारची आर्थिक लूट असून सरकारने अशा प्रकारची लूट थांबवून परीक्षार्थीना दिलासा द्यायला पाहिजे. एका तलाठी पद भरतीत जर १२७,कोटी जमा होत असेल तर अन्य पद भरतीत किती महसूल जमा होत असतो. ? प्रति वर्षी सरकार विविध पदांसाठी पद भरती करत असते.पोलीस,शिपाई तलाठी,शिक्षक भरती वैद्यकीय क्षेत्रातील विविध भरती आदी क्षेत्रात प्रती वर्षी हजारो पदे भरली जातात. या परिक्षावर भरमसाठ शुल्क आकारला जातो.या.परीक्षांसाठी इतका खर्च येतो का ?याचा विचार सरकारने करण्याची गरज आहे. २०२२ च्या जीआर नुसार एखाद्या शासकीय भरती परीक्षेत पाच लाखापेक्षा जास्त उमेदवार सहभागी होत असतील तर परीक्षा शुल्क ४७५ रुपये आणि १५ टक्के प्रशासकीय कार्यालयाचा खर्च असे पाचशे पदास रुपये आकारले जावेत मात्र तलाठी भरतीत १३लाख अर्ज आले असतानाही जादा शुल्क आकारण्यात आले असून ते शासनाने परत करावे अशी मागणी होत आहे.

सरळसेवा भरतीसाठी निवडण्यात आलेल्या कंपन्यांकडून घोटाळे होत असल्याने राज्य शासनाने २१ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब, क आणि ड संवर्गातील पदांच्या भरतीसाठी ‘टीसीएस’ आणि ‘आयबीपीएस’ या कंपन्यांची निवड केली. कंपन्यांचे शुल्कही यामध्ये ठरवण्यात आले. सध्या सुरू असलेल्या तलाठी भरतीसाठीही ‘टीसीएस’ कंपनीची निवड करण्यात आली. कंपनीच्या दरपत्रकानुसार पाच लाखांहून अधिक विद्यार्थी असल्यास ४९५ रुपये प्रति विद्यार्थी शुल्क आकारले जाणार आहे. याशिवाय प्रशासकीय कार्यालयाचा खर्च भागवण्यासाठी कंपन्यांनी दिलेल्या दरामध्ये १५ टक्के कर अशी वाढ करून शुल्क आकारले जावे असे निश्चित केले आहे. त्यामुळे ४९५ रुपयांत १५ टक्के रकमेची वाढ केली तरी हे शुल्क जास्तीत जास्त ५५० रुपयांपर्यंत असायला हवे. असे असतानाही तलाठी भरतीसाठी एक हजार रुपये आकारण्यात आले. मात्र ही आर्थिक लूट असून ज्यादा घेतलेले शुल्क परत करावे,अशी मागणी परीक्षार्थी व जनमानस करत आहे.

एका बाजूला केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे शुल्क १०० रुपये तर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे शुल्क २९६ रुपये इतके आहे. म्हणजे, जिल्हाधिकारी होण्यासाठी १०० रुपये लागत आहेत. तर, तलाठी होण्यासाठी तब्बल १००० रुपये मोजावे लागत आहेत.

# बेपत्ता महिला व मुलींची संख्या चिंताजनक

आधुनिक केसरी



गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रासह देशभरात मुली व महिला मोठ्या प्रमाणावर बेपत्ता होत असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो अर्थात एनसीआरबीच्या एका अहवालानुसार सन २०२१ या वर्षात ४ लाख महिला ९० हजार ११३ मुली बेपत्ता झाल्या असून यामध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असल्याचे समोर आले आहे एनसीआरबीच्या रिपोर्ट नुसार सन २०१९,२०२०,२०२१ या वर्षामध्ये सर्वाधिक मुली आणि महिला हरवण्याच्या प्रकरणांची नोंद मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये झाली आहे यात १६ ते ३५ वयोगटातील महिलांची संख्या लक्षणीय आहे. अनेकदा प्रेम, लग्न, नव्या स्वप्नांची आस यामुळे मुली घरातून पळून जातात किंवा करिअर, मोठ्या पगाराची नोकरी अशी आमिष दाखवून काही समाज कंटक मुलींना जाळ्यात ओढतात.यातील काही जणींचा शोध लागतो, चूक उमगल्यानंतर काही जणी परत येतात पण सर्वांनाच असे परत यायची संधी मिळतेच असे नाही. मार्ग चुकल्यास स्वतःच्या मर्जीने गेलेल्या मुली पुढे लैंगिक छळ, मानवी तस्करीच्या दुष्टचक्रात अडकतात. बेपत्ता महिलांचा वेळेत शोध न लागल्यास आखाती देशांमध्ये त्यांची तस्करी होण्याचे प्रकार ही समोर आले आहेत.महाराष्ट्र देशातलं एक प्रगत राज्य आहे. पण दुदैवाने या प्रगत राज्याच स्थान गुन्हेगारी विश्वात ही पुढे आहे. महाराष्ट्रातून जगभरात प्रवासाची उपलब्धता याचा दुरुपयोग तस्करीसाठी हा केला जातो. देशातील इतर राज्यातील मुली, महिलांना विविध आमिष दाखवून महाराष्ट्रात आणून त्यानंतर त्यांची विक्री होते. मानवी हक्कांची पायमल्ली करणारा हा गुन्हा आहे. गरीब, संकटग्रस्त मुले, महिला मानवी तस्करीचे बळी ठरतात. आपल्याला वाटतं की तस्करी म्हणजे ती गरीब माणसांचीच होत असणार असं नाही तंत्रज्ञानामुळे हे तस्करीच गुन्हेगारी विश्व आपल्या दाराशी येऊन ठेपलं आहे. मोबाईल, इंटरनेट, वेगवेगळे अँप्स यातून आपल्या मुलांवर, तरुण मुलींवर वेगळ्या जगाचं आकर्षण दाखवत जाळं टाकलं जातय. गरिबी, शिक्षणाचा अभाव, कौटुंबिक स्वास्थ्य नसणे अशा अनेक कारणांमुळे विविध स्तरातले लोक यात ओढले जातात. बालविवाह, बालमजुरी हे ही तस्करीचेच भाग आहेत. लहान मूल, अल्पवयीन मुली, सर्व वयोगटाच्या महिला, तरुण पुरुष तस्करीचे बळी ठरतात राज्यात हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी असलेला पोलिसांचा विभाग अधिक सक्रिय आणि आधुनिक व्हायला हवा. महिलांची फसवणूक, परदेशात वाहतूक यामध्ये गुन्हेगार आधुनिक झाले आहेत. तंत्रज्ञान, संपर्क माध्यमांचा प्रभावी वापर गुन्हा करण्यासाठी होत असताना त्यांचा बिमोड करण्यासाठी आपल्या यंत्रणेने अधिक सक्षम, सक्रिय आणि संवेदनशील ही होणे ही काळाची गरज आहे. भरोसा सेल, मिसिंग सेल अनेक ठिकाणी कागदावरच आहेत. त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ, स्वतंत्र जागा अशी आवश्यक यंत्रणा दिली गेली पाहिजे !

राजू जाधव, मांगूर, जि.बेळगांव

# शेतकऱ्यांच्या खात्यावर चार ऐवजी दोनच हजार जमा

## जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव: सरकारकडून शेतकऱ्यांची चेष्टा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** केंद्र सरकारने पंतप्रधान किसान सन्मान



योजना लागू केली. या योजनेच्या माध्यमातून वर्षाकाठी १२ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात टप्पा-टप्याने जमा केले जात होते. याच धर्तीवर राज्य शासनानेही १२ हजार रुपयांची वाढ करून २४ हजार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याची घोषणा केली. मात्र नंतर राज्य सरकारने यात बदल केला आणि ही योजना उशीराने अंमलात येणार असल्याचे सांगितले. यामुळे राज्य शासनाकडून शेतकऱ्यांची वारंवार चेष्टाच केली जात आहे. असा प्रश्न  शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांनी उपस्थित केला. केंद्र शासनाकडून पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना लागू केली आणि शेतकऱ्यांच्या खात्यावर २ हजार रुपये जमा होवू लागले. वर्षाला सहा हप्यात १२ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर म गील तिन वर्षांपासून जमा होण्यास सुरुवात झाली. राज्यातील सरकार बदलल्यानंतर शिंदे सरकारने शेतकऱ्यांनाही राज्य सरकार केंद्र सरकारप्रमाणे मदत करेल अशी घोषणा केली आणि ही मदत या १४ व्या हप्यापासून दिली जाणार असल्याचे जाहीर केले. शेतकरी एकीकडे खुश झाला होता. कारण आता २ हजाराऐवजी ४ हजार रुपये मिळणार या आनंदात शेतकरी वर्ग होता आणि हा हप्ता कधी जमा होईल याची वाट प्रत्येक शेतकरी लाभार्थी पाहत होता. दि. २८ जुलै २०२३ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात केंद्र सरकारचे २ हजार रुपये जमा झाले. मात्र या सोबत



राज्य सरकारचे २ हजार रुपये जमा न झाल्यामुळे या सरकारच्या निर्णयामुळे तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. एकीकडे शेतकरी संकटात आहे. राज्यातील काही भागात पाऊस अधिकचा झाला तर काही भागात अल्प झाला. ज्या भागात अल्प पाऊस झाला तेथे दुबार पेरणीच्या संकटात शेतकरी अडकला आहे तर जेथे अधिकचा पाऊस झाला तेथे ओल्या दुष्काळाने शेतकरी अडचणीत आला आहे. यामुळे केंद्र आणि राज्य शासनाची ही योजना शेतकऱ्यांना तारणार असल्याचे अनेक शेतकरी बोलून दाखवत होते. मात्र राज्य शासनाने यामध्ये युटर्न घेत ही योजना सध्या लागू झाली नाही. मंत्री मंडळाचा निर्णय झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात दोन हजार रुपये जमा केले जातील अशी भुमिका घेतली. यामुळे शेतकरी वर्गात राज्य शासनाच्या विरोधात सध्या चिड निर्माण झाली आहे. औरंगाबाद जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पावसाने दांडी मारली  असून अनेकांच्या शेतीतील पिके सुकून गेली. यातच शासनाकडून कोणतीही मदत किंवा घोषणाही अद्याप झालेली नाही.  मदत कधी देणार अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच सरकारच्या धोरणाविरोधात तिव्र नाराजी व्यक्त करत आहे आणि अशातच शेतकऱ्यांनी कोणतीही मागणी न करता राज्य सरकारने दोन हजार रुपयांची घोषणा केली. ही घोषणा हवेतच विरगळली काय? केवळ शेतकऱ्यांच्या बाबतीत हे सरकार घोषणा करत आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे आहे अशी वल्गना करत असून खन्यज्ञा अर्थाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचा प्रकार राज्य सरकार करत असल्याची तिव्र भावना शेतकऱ्यांतून आता उमटत आहे. यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांची मंचचेष्टाच केली काय अशी माहिती जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव  शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी बोलताना दैनिक आधुनिक केसरी प्रतिनिधी सुधाकर जेठे यांना प्रतिक्रिया दिली.



# सईदा कॉलनी येथे ड्रेनेजलाईनचे उद्घाटन

## प्रदीप जैस्वाल यांची केली लाडूतुला

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वार्ड क्रमांक 4 राजनगर-चेतनानगर येथील सईदा कॉलनी येथील नागरिक ड्रेनिजलाईन नसल्याने अनेक वर्षांपासून यातना भोगत होते. रस्ते व पायाभूत सुविधा नसल्याने नागरिक त्रस्त झाले होते. आज दुपारी औरंगाबाद मध्यचे आमदार प्रदीप जैस्वाल यांनी 90 लाख रुपये निधी ड्रेनिजलाईन व 60 लाख रुपये निधीत रस्त्याचे भुमिपूजन केले असल्याने येथील नागरिकांनी लाडूतूला करत फटाक्यांच्या आतिषबाजी करत जंगी स्वागत केले.

यावेळी येथील प्रतिष्ठित नागरिक व रहिवासी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक अब्दुल रऊफ, मा. नगरसेवक सय्यद मतिन, समाजसेवक साजिद मौलाना, शेख नाजिम, शेख मोईनोद्दीन लकी,  सईदा कॉलनी विकास समितीचे अध्यक्ष पत्रकार शेख मजहर, समन्वयक पत्रकार आरेफ देशमुख, शेख हमीदोद्दीन, सय्यद साबेर, जफर देशमुख, शहेबाज देशमुख, जावेद मेमन, सय्यद महेमूद, याकूब खत्री, इद्रीस खत्री, रहेमान खत्री, अखलाक देशमुख, शेख मोहसीन लकी, शेख मोबीन, अलीम हाफीज साहेब, शारदा घुले, शिंदे मैडम, विश्वनाथ राजपूत, शिवाजी सिरसाट, युवराज, वाकेकर आदी उपस्थित होते. आमदार जैस्वाल यांचे वार्डातील चौकात बैनर लावून उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी आपल्या भाषणात प्रदीप जैस्वाल यांनी सांगितले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मतदार संघासाठी आतापर्यंत विकासासाठी दोनशे कोटी निधी दिला. येथील नागरिकांची मागणी आहे कब्रस्तान व स्मशानभूमीसाठी जागा पाहीजे त्यासाठी पाठपुरावा करु. जात धर्म न बघता सर्व जाती धर्मातील लोकांचे कामे करण्यासाठी मी सदैव तत्पर आहे. जो शब्द दिला तो पाळण्याची माझी सवय आहे. सईदा कॉलनी येथील सर्व समस्या सोडवले जातील असे आश्वासन त्यांनी दिले. या वार्डात आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या निधीतून एकूण 5 कोटी 10 लाख निधीच्या विकासकामाचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सईदा कॉलनी ड्रेनिजलाईनसाठी 90 लाख, रस्त्यासाठी 60 लाख रुपये, हरिओमनगर रस्त्यासाठी 50 लक्ष, दत्तनगर रस्त्यासाठी 20 लक्ष, सांगळेनगर रस्त्यासाठी 30 लक्ष, रमाईनगर रस्त्यासाठी 20 लक्ष, अंबरहिल रस्त्यासाठी 20 लक्ष, जिजाऊ भोसले कॉलनी रस्त्यासाठी 10 लक्ष, सुधीर हनुमाननगर रस्त्यासाठी 10 लक्ष निधीच्या कामाचे भुमिपूजन करण्यात आले.

# हातगाडी फेरीवाले, रिक्षावाल्यांना सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शहरातील हातगाडी वरील विक्रेते ( हॉकर्स ) यांची शेवगावचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील यांच्या दालनात चर्चा होऊन रस्त्यावरील हातगाडी फेरीवाले रिक्षावाले यांना सूचना देण्यात आल्या व वाहतुकीला अडथळा येणार नाही, याची काळजी घेऊन व्यवसाय करण्यासाठी पोलिस प्रशासनाचे सहकार्य राहील, असे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील साहेब यांनी सांगितले. यावेळी नगर पालिकेने हॉकर्स झोनसाठी ठरवू दिलेल्या रस्त्यावर पांढरे पट्टे लवकरात लवकर पेंट करून द्यावेत. सर्व हातगाडीवाल्यांनी आपल्या गाडीसमोर वाहणे लावू देऊ नये, असे ठरले आहे. तसेच सर्व हॉकर्स आपल्या गाडी समोर नो पार्किंग बोर्ड लावणार व न ऐकणाऱ्या वाहन चालकावर प्रशासन कारवाई करणार असेही ठरले आहे.या वेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी रिक्षा युनियनचे अध्यक्ष कॉ. ॲड सुभाष लांडे शहिद भगतसिंग हॉकर्स युनियन अध्यक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौन्सिल सदस्य कॉ संजय नांगरे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशिष शेळके  नगर परीषद अधिकारी सोनटक्के साहेब,वाहतूक पोलीस शाखेचे राहुल खेडकर, गणेश गलधर फेरीवाले संघटनेचे इरफान पठाण, जुबेर शेखसर, मुन्ना भोकरे, राहुल धनवडे, बन्सी गायकवाड, बबलु गुप्ता,जावेद बागवान, किरण गायकवाड, सतीष गायकवाड,भुजबळ पप्पु,धनवडे अप्पा, राजेंद्र मोहीते,राजेंद्र भातकुडे,भगवान कांबळे व सर्व हॉकर्स संघटनेचे सभासद उपस्थित होते.



# प्राचार्य अशोक गीते, बालाजी आवटे यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा,येथील नामांकित असलेल्या संत जनार्धन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्राचार्य अशोक गिते व सहशिक्षक बालाजी आवटे हे नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाल्याने त्यांच्या प्रदिर्घ सेवेचा गौरव करण्यासाठी संस्था अध्यक्ष मुकुंद भाऊ चव्हाण, सचिव नामदेव चव्हाण, व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माध्यमातून गौरव सोहळा आयोजित केला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुकुंद चव्हाण तर प्रमुख पाहुणे सौ




मीनाताई राऊत, सचिव नामदेव चव्हाण, विलास चव्हाण, रामराव चव्हाण,रमेश गिते, इंद्रजित घाटुळ हे होते तर या प्रसंगी संस्थेच्या वतीने व सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माध्यमातून सत्कार करण्यात आला तसेच परिसरातील पालक विद्यार्थी, पदाधिकारी व उभयतांच्या आप्तेष्टांनी यथोचित सन्मान केला.

# अणणा भाऊ साठे जयंतीनिमित्त शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या१०३ व्या जयंतीनिमित्त  येथील इंदिरानगर



भागातील पालिकेच्या प्राथमिक शाळेतील  १०३शालेय विद्यार्थ्यांना १०३ शालेय बॅग व १०३वह्या व पेन वाटप करून लोकशाहीर युवा मंच यांनी सामाजिक बांधिलकी जपली,  प्रथम सर्व उपस्थित यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलव,माजी नगराध्यक्ष तथा भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ,दिनेश परदेशी,उपनगराध्यक्ष साबेरखान,गट नेता नगर सेवक दशरथ बनकर, भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, नगर सेवक डॉ,निलेश भाटिया,इम्रान कुरेशी,राजेश गायकवाड, वसंत त्रिभुवन,राजेश गायकवाड, युवा सेना प्रमुख आमिरअली,माजी शैक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, भागीनाथ त्रिभुवन यांच्या हस्ते या शालेय सहित्यचे वाटप करण्यात आले,लोकशाहीर युवा ग्रुप चे रोहन पेटारे, अमर साळवे,सागर अस्वले, संदेश त्रिभुवन, सुरज शिंदे, संघरत्न पडवळ,सोमेश्वर गोरे,सिद्धार्थ गायकवाड,साईराज पेटारे यांनी पुढाकार घेतला. सूत्र संचलन  धोंडीराम ठाकूर यांनी केले आभार मुख्याध्यापक टी. आर. महाले यांनी मानले या प्रसंगी विद्यार्थी  पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शासकीय बीज गुणन केंद्रातील मजुरांचे कामबंद अंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** तालुक्यातील पारडी येथील प्रमुख शासकीय बीज गुणन केंद्र व फळरोपवाटीका येथे कामावर असलेल्या मजुरांची मजुरी मागील अनेक कालावधी पासून मिळाली नसल्याने कामावरील मजुरांनी दि. १ ऑगस्ट पासून बीज गुणन कार्यालया समोर कामबंद व असहकार आंदोलन सुरू केले आहे. राज्य शासन शेतकऱ्यांना माफक दरात व दर्जेदार विविध प्रकार व जातींची रोपे मिळावी म्हणून फळरोपवाटीका च्या माध्यमातून सेवा पुरवते. तेथील रोपटे यांना पाणी देणे, तृण काढणे व इतर आवश्यक कामासाठी कंत्राटी स्वरूपाने गुत्तेदार मार्फत मजूर लावण्यात येतात. मात्र त्या मजुरांना वेळेवर मजुरी अदा करण्यात येत नसल्याने मजुरांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. पुरुष व महिला मजूर आणि गुत्तेदार यांची दि. २४ नोव्हेंबर २०२१ पासुन ते आजपर्यंतची मजुरी थकीत आहे. मागील अनेक वर्षांपासून आमची मजुरीची रक्कम ही सहा महीने तर कधी वर्षे भराच्या अंतराने मिळते. विशेष म्हणजे कायम मजुरीची थकबाकी वर्षे ते दिड वर्षे दरम्यान थकीतच राहते. संबंधित गुत्तेदाराने वरिष्ठ कार्यालयाकडे बील प्रस्ताव सादर करुन कार्यालयास प्राप्त रक्कम देण्यास प्रत्येकवेळी तीन ते च्यार महीन्याचा कालावधी लागतो.

पारडी येथील कृषि पर्यवेक्षक बऱ्याचदा काम नाही असे सांगतात तर कधी मजुरी देण्यास पैसे नाहीत कामावर येवु नका असे सांगतात. मग आमची आजपर्यंतची संपुर्ण मजुरी येईपर्यंत आम्ही रोजच कामावर येत रहाणार. आमची थकीत असलेली रक्कम अदा करा त्यानंतरच काम बंद करण्याचा विचार करा. कामबंद व असहकार आंदोलन दरम्यान आम्ही कामावर येणार नाही आणि अन्य मजुरांना कामावर येऊ देणार नाही. असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. तसेच दबावतंत्राचा वापर केल्यास सहकुटुंब उपोषण करणार असल्याचा इशाराही कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर रमेश डिकळे, संभाजी डीकळे, मारोती डिकळे, रोहिदास डिकळे, संभा डिकळे आदीं मजुरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# जि.प. मराठी शाळेत अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळकांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी येथील जि.प.मराठी शाळेत १/८/२३ मंगळवार रोजी लोकशहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंची १०३ वी जयंती तथा बाळ गंगाधर टिळक यांची १०३ वी पुण्यतिथी निमित्त दोघा थोर विभुतींना विनम्र अभिवादन करून विविध कार्यक्रम घेण्यात आले. यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यत सरपंचपती भागवत जाधव व मुख्याध्यापक अरुण गवयी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले करण्यात आले. जि.प.मराठी शाळेत या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष सरपंच संध्याताई भागवत जाधव यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ज्ञानेश्वर मख सर सामाजिक कार्यकर्ते व शालेय शिक्षण समिती चे विष्णू राठोड यांनी केले.एम.एस.मेमाने व जी एन चांदणे यांनी विद्यार्थ्यांना आपले मनोगत व्यक्त केले.या दोन्ही कतृत्ववान थोर दिवंगत विभुतींच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित शिक्षकवृंदच्या हस्ते करण्यात येऊन त्यांना अभिवादन करण्यात आले.मुख्यधापक अरुण गवई यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून, कष्टकरांच्या व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे" या वचनाचा हवाला देत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कष्टाची जाणीव करुन दिली, लोकमान्य टिळकांबद्दलही सुंदर असे मत त्यांनी मनोगतातून व्यक्त केले. आर पी जाधव यांनीही विद्यार्थ्यांना या दोन्हीही थोर व्यक्तीमत्वांकडून आपणास खुप काही शिकायला मिळत असल्याचे सांगून आपल्या भावना व्यक्त केल्या. सदर कार्यक्रमात या थोर व्यक्तींच्या जीवनपटावर आधारित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली, मुख्याध्यापक अरुण गवई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डी आर सैतवाल यांनी केले तर आभार एन एस मोरे यांनी मानले, सदर कार्यक्रम यशस्वी होणेसाठी प्राथमिकयाच्या शिक्षक-शिक्षिका-शिक्षकेतर बंधु-भगिनींनी मोलाचे सहकार्य केले. या सर्व मुद्याचे घटनेने कसे मिळाले संरक्षण घटनेने आहे.त्याची महीती व उदाहरणे देऊन कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरपंचपती भागवत जाधव,अरुण गवळी मुख्याध्यापक, विष्णू राठोड उपाध्यक्ष,एम एस मेमाने,जी एन चांदणे,एन एस मोरे,आर पी जाधव, ज्ञानेश्वर मख सर,डी आर सैतवाल,भुरलाल जाधव,शिक्षक, शिक्षकतेर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ज्ञानकुंज महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल बाजार सावंगी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा. योगिता पारनेरे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. योगेश सुरडकर यांनी केले तसेच गुणवंत्त विद्यार्थ्यांचे सत्कार रुपी ज्ञानकुंज महाविद्यालयातर्फे कला शाखेतून प्रथम आलेले विद्यार्थीनी पल्लवी राठोड या विद्यार्थिनीला कै. शिवराम रंगनाथ पाटील दारकुंडे या नावाने विद्यार्थिनीला पुरस्कार रुपी एक हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले व वाणिज्य शाखेतून प्रथम आलेले विद्यार्थ्यांनी मयुरी धुमाळ या विद्यार्थिनीला कै. पुंजाजी राऊबा पाटील काळे पुरस्कार रुपी एक हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच विज्ञान शाखेतून प्रथम आलेले विद्यार्थ्यांनी आकांक्षा गिरी या विद्यार्थिनीला कै.शिक्षण महर्षी कृष्णाराव काशिनाथ पाटील जाधव पुरस्कार रुपी एक हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच क्रीडा क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी विद्यार्थिनीने वेटलिफ्टिंग मध्ये राज्यस्तरापर्यंत मजल मारणारी प्रणवती आघाडी तसेच थाळीफेक मध्ये राज्यस्तरापर्यंत मजल मारणारा विद्यार्थी रवींद्र काटकर या विद्यार्थ्यांचा ही याप्रसंगी सत्कार करण्यात आला व शेअर मार्गदर्शनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. सतीश जी सातव साहेब व प्रा. विवेक दीक्षित सर व राम पवार सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विजयजी दारकुंडे सर व सचिव भाऊसाहेबजी काळे सर यांनी ज्ञानकूंज महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी हे गुणवंत ,ज्ञानवंत ,व किर्तीवंत, व्हावे म्हणून आशीर्वाद रुपी शुभेच्छा दिल्याया याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झुंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड, श्री भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे, पाचवने मॅडम, खान मॅडम ,चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव ,धुमाल बाबा, यांची उपस्थिती होती.

# तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लोहा तहसील कार्यालयाचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे आपल्या पदाचा गैरवापर करत अवैध रेती व अवैध मुरूम उत्खनन करण्याऱ्यांशी आर्थिक हितसंबंध जपत या अवैध रेती व मुरमु उतखनन करणाऱ्यांना अभय देत असून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेल्या शेतीवाट व पानंद रस्ते करणे ऐवजी व त्या जागेवरील वाद-विवाद मिटवण्याऐवजी अनेक दोन नंबरच्या धंदेवाल्यांना ऑफिस टाईम देऊन शेतकऱ्यांना दिवसेंदिवस ताटकळत ठेवत आहेत, माळेगाव येथील धान्य गोडाऊन बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध झाला असून पण तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे उपलब्ध गायरान जागा गोडाऊन बांधकाम करण्यासाठी उपलब्ध करून देत नाहीत, कारण या गोडाऊन बांधकाम गुत्तेदाराने तहसीलदार यांना भेटून आर्थिक व्यवहार करावा मग ती जागा उपलब्ध करून देतो असे तहसीलदार यांचे म्हणणे आहे असे निवेदनात नमूद केलेले आहे, तसेच लोहा येथे तलाठी निवासस्थानासाठी ही निधी येऊन जमा झाला आहे तरी त्यासाठी ही जागा तहसीलदार हे उपलब्ध करून देत नाहीत व हा निधी खर्च केल्या जात नाही, संजय गांधी निराधार योजना अंतर्गत निधी वाटप प्रत्येक महिन्याला लाभार्थ्यांना केला जात नाही अशा लोकहिताच्या अनेक तक्रारी येत असून तहसीलदार ही अशा लोकहिताच्या तक्रारीवर प्रत्यक्ष कारवाई करत नाहीत अशा अनागोंदी कारभार करणाऱ्या लोहाचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांची तात्काळ चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी खाबेगावचे सरपंच प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप रामजी पौळ , सचिन लक्ष्मण क्षीरसागर ,टायगर ग्रुप चे लोहा तालुका अध्यक्ष वैभव कुमार हाके, सचिन कदम, राहुल बोरगावकर, आदिनाथ पांचाळ, अर्जुन पवार, भुजंग शिंदे ,माधव पवार या लोहा तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी राज्याचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, निवेदनावर वरील सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# यावलमध्ये फर्निचर दुकानांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** यावल वनविभागातर्फे यावलमधील अवैध फर्निचर दुकानांवर धडक कारवाई करण्यात येऊन सुमारे एक लाख रुपये किंमतीचे वनलाकूड आणि मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावल वनविभागातर्फे यावल आणि किनगाव येथील अवैध फर्निचर दुकानांवर छापे टाकण्यात आले.बोदवड तालुक्यातील नांदगाव येथील तक्रारदारास शिधिपत्रिकेतील आई आणि मुलाचे नाव कमी करून नवीन शिधापत्रिका तयार करावयाची होती.

# लोहा शहरात श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्रीक्षेत्र



त्र्यंबकेश्वदशर ,जा नाशिक सद्‌गुरू प.पुज्य मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पीटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व गुरूमाऊली प पुज्य आण्णासाहेब मोरे यांच्या आदेशानुसार श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित कै लक्ष्मणराव बिडवई नगर लोहा येथे दिनांक १२ऑगस्ट २०२३ शनिवार रोजी मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण शिबीर होणार असून तरी लोहा शहरातील व तालुक्यातील सर्व सेवेकऱ्यांनी व भाविक भक्तांनी व रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे. मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण तज्ञ वैद्यांचे मार्गदर्शन तसेच शिबीरमध्ये बी पी, शुगर, एसीजी, फेजिओथेरेपी मोफत तपासणी मान, पाठ, कंबर, गुडघे, सांधेदुखी, वात, कफ, पित्त, विकार तसेच तज्ञ वैद्याच्या मार्गदर्शनाने हृदयविकार, सर्व प्रकारचे कॅन्सर, मुतखडा, त्वचा विकार, वात विकार, पोटाचे विकार, महिलांचे विकार, मुळव्याध, कावीळ, लहान मुलाचे विकार, मनोविकार इत्यादी विकाराचे रोगनिदान केले जाईल. सदरील मोफत आरोग्य तपासणी शिबीर दि. १२ ऑगस्ट २०२३ शनिवार रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र ( दिंडोरी प्रणित ) कै लक्ष्मणराव बिडवई नगर लोहा येथे होणार आहे. तरी गरजूनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आव्हान श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांच्या वतीने करण्यात आले.






# मणिपूर हिंसाचार; भाकपची निदर्शने !

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आम्ही दंगलग्रस्त मनिपुरच्या नागरीकांसोबत, अशी हाक देत भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे मनिपुरमधील दंगलखोर व बलात्काऱ्यांवर कारवाई करा या मागणीसाठी देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणुन शहानुमियॉं दर्गा चौकात, औरंगाबाद येथे निदर्शने करण्यात आली.

याबाबत असे की, लोक संपुर्ण आयुष्यभर कष्ट करुन एक घर बनवतात आणि जातीयवादी दंगली घडवुन क्षणात नष्ट केले जातात, मनिपुर मधील भाजपा सरकार नागरिकांच्या मालमत्तेचे आणि महीलांच्या अब्रुचे रक्षण करण्यात अपयशी ठरले आहे. मनिपुरमध्ये दंगली घडवुन शेकडो घरे, चर्च जाळण्यात आले , सरकारी आकडयानुसार 50648 लोक बेघर झाले आहेत, वास्तविक आकडा यापेक्षा मोठा आहे. राज्य सरकार व केंद्र सरकार या दंगलीवर नियंत्रण आणायला अपयशी ठरली, प्रधानमंत्र्यांनी मनिपुरला भेटही दिली नाही, मौन बाळगले, सर्वोच्च न्यायालयाने दखल घेईपर्यंत शांततेचे आवाहनही केलेले नाही! भाजपा कायदा आणि सुव्यवस्था नव्हे तर अराजकता आणायची आहे.

ख्रिश्चन समुदायाचा कींवा कोणत्याही समाजाचा अपमान करणे, त्यांची संपत्ती नष्ट करणे आणि दहशत माजवणे हे आपल्या सामाजिक आणि न्यायिक मूल्यांच्या विरुद्ध आहे. सर्व मानवांच्या समान हक्कांचे संरक्षण करण्याच्या बाजूने आम्ही आहोत आणि अशा हिंसाचाराच्या विरोधात आपण सतर्क राहण्याचेही आवाहन केले होते. हा हिंसाचार सर्व अंल्पसंख्यांक मग ते मुस्लीम, खिश्चन, शिख, जैन, पारशी इत्यादि विरोधात असु शकतो, असतोही. याविरुद्ध सर्व अल्पसंख्यांकांनी व जागरुक हिदुंनीही एकत्र यावे असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे मोठ्या संख्येने पैठणगेट येथे नागरीक जमा झाले व त्यांनी पैठणगेट येथे मुसळधार पाऊस असतांनाही जोरदार निदर्शने केली. यावेळी बलात्कारीयोकी भाजपा सरकार नही चलेगी, महीलाओको नंगा कर घुमाया जा रहा था तब पुलीस क्या रहीथी ? सुप्रिम कोर्ट पुछ रहा है मोदी सरकार जवाब दो, भाजपा वालो शर्म करो, मनीपुरकी मॉ बहनो हम तुम्हारे साथ है, नरेंद्र मोदी मुर्दाबाद , आरएस एस मुर्दाबाद, मनीपुरचे सरकार बर्खास्त करा, चर्च जलाना बंद करो, खिश्चनो के घर जलाना बंद करो, दंगेखोरोसे पुलीस की बंदुके वापस लो, अदाणी के लिए मनीपुर जलाना बंद करो,हिंदु, मुस्लीम, बौद्ध, सिख, ईसाई, पारसी, जैन, लींगायत, शिवधर्मी हम सब भाई भाई। ईत्यादी घोषणांनी शहानुरमिया दर्गा परिसर दणाणला. ही निदर्शने आराधा तास चालले, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शहरसचिव कॉ अभय टाकसाळ, कॉ जफर फजलु रहमान खान यांची भाषणेही झाली. यावेळी निदर्शकांमध्ये सर्व धर्माची नागरीक होते, त्यांच्या हातात लक्षवेधी फलके होती. मनिपुरच्या नागरिकांसाठी आर्थिक मदत गोळा करण्याचा पुढिल कृती कार्यक्रमही भाकपने जाहीर केला. यावेळी अ‍ॅड अभय मनोहर टाकसाळ ( शहर सेक्रेटरी, भा.क.प. ) कॉ. राजु हिवराळे, कॉ जफर फजलु रहमान खान, कॉ रफीक बक्शसफीया शेख राजुद्दीन,रुकसाना खान , खुद्दुसिया खमर जफर खान, शिला मिसाळ, सुभाष मिसाळ, शहनाझ शेख फैय्याज, नसरिन बेगम शेख वाजीद, यासमीन शेख, हनिफ शेख अहमद, जरीन शेख महेबुब, अरबाज खान, अब्दुल रहमान खान, आसमा शेखम मीला इत्यादिचा सहभाग होता. मनिपुरमधील खिश्चनांवरील हल्यांच्या विरोधात औरंगाबादमधील मुस्लीम महीला पुरुष मोठ्या संख्येने निदर्शनात सहभागी होत्या.

# ग्रामसेवकाने केली ठेकेदाराची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरठाण ग्रामपंचायतीचा अजब कारभार ज्याला पेव्हर ब्लॉक चे काम दिले त्यांची केली फसवणूक त्यांच्या कडून पूर्ण काम करुन



बिले घेतले काढून वरठान येथे सन 2020-21 मधील 15 वित्त आयोग पेव्हर ब्लॉक काम नरसिंह गोविंदा सोळंके ठेकेदारा काम केले मात्र बिल अद्यापही मिळाले नाही ग्रामपंचायत कार्यालय वरठाण ता. सोयगावः जि. औरंगाबाद येथील 15 वित्त आयोग मधील पेव्हर ब्लॉकचे कामाचे 4 लक्ष रुपये होते ते मला अद्याप पर्यंत मिळाले नाही आणि हे काम मला ग्रामपंचायत कार्यालयाने दिले असून सदर काम मी 16 एप्रिल 2022 रोजी पूर्ण करून दिले. बिलाची मागणी केली. असता माझ्या अशा निदर्शनास आले की मला दिलेल्या कामाची बिल दिनांक 31/3/2023 रोजी BM निलेश शेजवळ व ग्रामसेवक विजय जोंधळे या दोघांनी संगणमत करून काढून घेतले आहे. मी गेल्या 1 वर्ष पासून आजपर्यंत त्यांच्याकडे बिलाची मागणी करता हो देतो, लवकर देतो, असे सांगून वेळ ढाळत राहिले सदर कामासंदर्भात मला मजुरांची मजुरी, पेव्हर ब्लॉक विकत आणल्याचे पैसे, कच, खड़ी, रेती, सिमेंट, ट्रॅक्टर ( 1 चेतन प्रकाश सोळके MH-20-8354, 2 कर्णसिंग काकासाहेब सोळंके ( MH-19-6268 ) वाल्याची मजुरी देणे असल्यामुळे त्यांचा सारखा तगादा माझ्या मागे आहे माझ परिस्थिती हालाखीची असल्यामुळे मी त्यांना पेमेंट देऊ शकत नाही, हे सर्व कामे माझ्या मुळे क दिले आहे, व या कामाची MB ही पूर्ण झालेली आहे. या दोघांना मी काही बोलू शकत ना ग्रामपंचायत मला 15 ऑगस्ट 2023 पर्यंत माझ्या पेमेंट द्यावे अन्यथा मी 15 ऑगस्ट 2023 रोजी दुपारी ग्रामपंचायत कार्यालय मध्ये किंवा समोर आत्मदहन करून घेणार असल्याचे निवेदन ग्रामपंचायत कार्यालयात व तहशिल कार्यालयात देण्यात आले आहे.



# कैलास विद्यालयामध्ये मुख्याध्यापक कैलास ससे यांना ग्रामस्थांच्या वतीने निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**बोडखा :** कैलास विद्यालय येथील मुख्याध्यापक श्री कैलास गणपतराव ससे सर यांचा सहपत्नीक सेवानिवृत्ती सोहळा संपन्न झाला. यावेळी बोडखा येथील सरपंच श्री.अशोक जाधव , उपसरपंच रफीक पटेल , सदस्य डॉ.जाकीर शहा , आजीनाथ काटकर, सुनिल शिंदे,चेअरमन सर्जेराव लोंढे, काकासाहेब लोंढे,पोलीस पाटील रायभान सोनवणे , माजी उपसरपंच सलीम पटेल , बिलाल मिस्तरी, घृ.शिक्षण संस्था येसगांव नं.१ चे संस्थापक सचिव श्री. खंडागळे सर , उपाध्यक्ष बी. आर. निकम सर , कोषाध्यक्ष श्री.डी.टी. पवार सर , एस.एल. ठोंबरे, एस. बी.गोल्हार , आर.बी.शिंदे ,एस.एम. क्षीरसागर ,जी. डी. पवार, जी.एस.मिराशे, आर.बी.अधाने, श्रीमती खंडागळे, श्रीमती ठोंबरे, श्रीमती ससे, मनोज परदेशी,संजय सपकाळ,माजी विद्यार्थी समस्त गावकरी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# वडोदबाजार, बाबरा सोशल मीडिया प्रमुखपदी कृष्णा काळे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ या संघटनेची फुलंब्री



तालुका ग्रामीण आणि शहर कार्यकारिणी सोमवारी शहरातील संत सेना महाराज मंदिरात जाहीर करण्यात आली. ग्रामीण तालुकाध्यक्षपदी गणेश वखरे यांची, युवा तालुकाध्यक्षपदी श्याम आदमाने, शहर अध्यक्षपदी शरद पंडित, तर जिल्हा उपाध्यक्षपदी संजय पंडित यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष संतोष बोराडे होते. या वेळी नाभिक समाजाचे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील वास्तव आणि त्यावरील उपाययोजना या विषयावर बोराडे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित समाज बांधवांच्या शिफारशीनुसार खालील कार्यकारिणी आणि पदाधिकारी यांच्या नियुक्त्यांची सर्वानुमते घोषणा केली. फुलंब्री ( ग्रामीण ) तालुका कार्यकारिणी तालुकाध्यक्ष गणेश वखरे ( गणोरी ), उपाध्यक्ष सुनील बिडवे ( आळंद ), कृष्णा औटे ( पाल ), सचिव प्रभाकर नाईक ( पिंपळगाव वळण ), सहसचिव रावसाहेब कानडे ( सताळ पिंप्री ), मार्गदर्शक दत्तू बोर्डे आणि सोशल मीडिया प्रमुख रवी आदमाने आदींची नियुक्ती करण्यात आली. फुलंब्री ( ग्रामीण ) युवा तालुका कार्यकारिणी तालुका अध्यक्ष श्याम आदमाने ( बाबरा ), उपाध्यक्ष कैलास वखरे ( कान्होरी ), पंढरीनाथ वाघ ( बोरगाव अर्ज ), सचिव दत्तू काळे ( उमरावती ), सहसचिव गजानन हातकंगणे ( गणोरी ), मार्गदर्शक संतोष काळे, गोरख वरपे, सोशल मीडिया प्रमुख कृष्णा काळे( खामगाव गो. ) व नितीन वाघ यांची नियुक्ती करण्यात आली. फुलंब्री शहर कार्यकारिणी अध्यक्षपदी शरद पंडित, उपाध्यक्षपदी बबलू सुरडकर, नवनाथ वखरे, सचिव रुपेश नाईक, सहसचिव मन्साराम नाईक, मार्गदर्शक अजिनाथ शिंदे, सोमीनाथ तावरे, ऋषिकेश पंडित, बबन वाघ तर सोशल मीडिया प्रमुखपदी -साईनाथ बोर्डे आणि मनोज नाईक यांची नियुक्ती करण्यात आली. व गावातील पांडूरंग जोगदंडे, आजीनाथ बापू सोनवणे, साजिद पठाण , गोरख काटकर, बाबासाहेब सोनवणे , हरिदास सोनवणे, सोमनाथ सेठ सोनवणे, दत्तू चव्हाण, एकनाथ काटकर , भगवंता सोनवणे,गंगाधर काटकर( पोलीस पाटील ) ,रेवनाथ सोनवणे ,दत्तू चेरमन सोनवणे, जगन चव्हाण, सुखदेव वाघ, किशोर जाधव , अक्षय हिवाळे , अंकुश सोनवणे, नवनाथ सोनवणे, दोंरकादास सोनवणे ,अक्षय सोनवणे,प्रदूम काटकर,ज्ञानेश्वर बखळे, धर्मराज काटकर, विशाल बखळे किशोर सोनवणे, डिगंबर सोनवणे व इतर प्रतिष्टीत लोकांनी शुभेच्छा दिल्या.



# माळीवाडा येथे साठे जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**माळीवाडा :** येथे लोकशाहीर डाँ.आण्णा भाऊ साठे यांची 103 वी जयंती साजरी करण्यात.यावेळी झेडा वंदन माजी नगरसेवक राजुभाऊ शिंदे, उपसरपंच कडू किर्तीकर, यांच्या हास्ते करण्यात आले. सरपंच अनिता हेकडे, ग्रा.पं.सदस्य धम्मापाल गायकवाड ,नाना बर्डे,कृष्णा मुळे, मनेश गाजरे यांच्या हस्ते आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास मान्यवराचा हस्ते हार घालुन पुजन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनाचे भाषणे झाली. यावेळी माजी नगरसेवक राजुभाऊ शिंदे यांनी लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जिवनावर व्याख्यान दिले. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या परिसरात विद्युत रोशनाई केली. रांगोळी टाकून परीसर सजवला होता.आण्णा भाऊ साठे यांच्या जय घोशाने परिसर दुमदुमला. यावेळी माजी नगरसेवक राजुभाऊ शिंदे, सरपंच अनिता हेकडे उपसरपंच कडू किर्तीकर, ग्रा.पं. सदस्य धम्मापाल गायकवाड, नाना बर्डे,कृष्णा मुळे,मनेश गाजरे, माजी ग्रा.पं, सदस्य सुधाकर हेकडे,नंदकिशोर मुळे,पपू आढाव, राम पेहरकर, बाबा मुळे, एकनाथ सिरसाठ, भास्कर गायकवाड, मुख्यधापक गंगाधर आधाने,नंदकिशोर मुळे, पपू आढाव, राम पेहरकर, पुण्यनगरी पत्रकार जावेद शेख,प्रा.शिवाजी गायकवाड लोकमतचे पत्रकार अमेर शेख,ग्रा.प.सदस्य कमलबाई,अशाबाई अस्वार,ताराबाई तुपे,मिरा साळवे, लता आस्वार, दगडाबाई आस्वार, शिवाजी आस्वार, गणेश अस्वार,प्रदिप अस्वार,शुभम खंडागळे, भागिनाथ अस्वार,असाराम अस्वार, सतिष अस्वार,शुभम खंडागळे,बंडू अस्वार,रामभाऊ आस्वार,किशोर आस्वार,तसेच गावचे पोलीस पाटील प्रमोद साठे,कैलास आस्वार,सुखदेव खडागळे,सुनिल बागूल समाज बांधवाची माहिलाची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माळीवाडा ग्रामपंचायत येथे लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी व लोहशाहिर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त प्रतिमेस पुष्प हार घालुन सरपंच अनिता हेकडे उपसरपंच कडू किर्तीकर यानी पुजन केले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य गावकरी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# राजेंद्र फंड यांना सर्वद प्रतिष्ठानचा स्टार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** येथील सर्वद प्रतिष्ठानचा 2023 चा अतिशय सन्मानाचा असा राज्यस्तरीय



स्टार साहित्यिक पुरस्कार या वर्षी शब्दगंध साहित्यिक परिषदेचे प्रसिध्दी प्रमुख साहित्यिक राजेंद्र फंड यांना घोषित केल्याचा निर्णय या प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. सुचेता पाटील व ओंकार देशपांडे यांनी पत्राद्वारे कळविला आहे.

राजेंद्र फंड यांचे आतापर्यंत 3 कविता संग्रह, 1 पुस्तक, 1 एकांकिका प्रकाशित असून 1कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

ते सहसंपादित करत असलेला वार्षिक दिवाळी अंक " ग्रामसेवा संदेश" यांच्या आतापर्यंत 15 आवृत्ती प्रकाशित झालेल्या आहेत. याचबरोबर अनेक कविता संग्रह, कथासंग्रह यांचे परीक्षण ,अखिल भारतीय विद्यापीठीय कविता स्पर्धेचे परीक्षण, अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनात कविता स्पर्धेचे अध्यक्षपद, विश्वस्तरीय लेखन स्पर्धेचे परीक्षक, शब्दगंध साहित्य संमेलनाच्या मुख्य कार्यकारिणीत सहभाग, कविसंमेलनाचे आयोजन इत्यादी अनेक साहित्यिक कार्य त्यांनी आतापर्यंत केले आहे. त्यांच्या या साहित्यिक प्रवासामुळे त्यांना आतापर्यंत अखील भारतीय स्तरापासून ते राज्यस्तरीय 20 पुरस्कार आतापर्यंत मिळालेले आहेत. सदर पुरस्काराचे वितरण हे 26 ऑगस्ट रोजी अभय इंटरनॅशनल स्कूल विक्रोळी पूर्व मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य तरुणांसाठी प्रेरणादायी : कॉ. मधुकर खिल्लारे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतनिमित्त भारतीय महिला फेडरेशन व परिवर्तन कम्प्युटर्स तर्फे अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस पतसंस्थेचे श्री बाळासाहेब साळुंखे तर अध्यक्ष म्हणून भारतीय महिला फेडरेशनच्या वसुधा कल्याणकर तसेच बांधकाम कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष व परिवर्तन कम्प्युटर्सचे संचालक कॉ. मधुकर खिल्लारे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच पालक म्हणून उर्मिला विश्वकर्मा, बाळासाहेब भद्रे व संजय ससाणे यांचीही उपस्थिती होती. या वेळी कॉ मधुकर खिल्लारे यांनी पुढे सांगितले की दीड दिवस शाळेत गेलेले अण्णाभाऊ छोट्याशा गावातून मुंबईला कामगार म्हणून आले व त्यांची मार्क्सवादी विचारांशी ओळख झाली. पुढे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या सोबतीने त्यांनी देशातील कामगार व ग्रामीण,दलित स्त्रियांच्या जीवनाचे वास्तव चित्रण करणारे साहित्य निर्माण केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष कॉ वसुधा कल्याणकर यांनी सांगितले की शाहीर अण्णाभाऊ, शाहीर अमरशेख व शाहीर द.ना गवाणकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून लोकगीते व पोवाडे रचून सामान्य माणसाला चळवळीशी जोडले.

या वेळी बाळासाहेब भद्रे यांनीही विचार व्यक्त केले. या सभेचे सूत्रसंचालन खुशी सोनवणे तर आभार प्रतीक्षा पवार या विद्यार्थिनीने मानले.

कार्यक्रमासाठी वैष्णवी शिंदे, नितिन साळवे, धनश्री इंगळे, निकिता चव्हाण, पवन कोळे, वैष्णवी मरकड, अंकिता कीर्तीशाही, निकिता काळे, सानिका तोंडे, पंकज शर्मा, मनीष भदरगे, ओमकार जैस्वाल यांनी परिश्रम घेतले.

# चिंचोली (खुर्द) महाविद्यालयाला परीक्षा केंद्र द्या

## प्रा. नीलेश बेलखेडे यांचे कुलगुरूंना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



चिंचोली ( खुर्द ) – राजुरा मार्ग पूर्णता खड्डेयुक्त असून विद्यार्थी प्रवासादरम्यान मोठ्या संकटात सापडत आहे . परिसरातील ग्राम पंचायत व पालकानीसुद्धा चिंचोली ( खुर्द ) येथेच परिक्षा केंद्र देण्याची मागणी केली आहे . शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोग ( यु .जी .सी ) च्या निकषानुसार महाविद्यालयाची पटसंख्या, त्याठिकाणी योग्य सोई सुविधा, ईमारत, बैठक व्यवस्था बरोबर आहे . याविषयी महाविद्यालयाने पत्रव्यवहार सुद्धा केला परंतु योग्य प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे शिवसेना– युवासेनेच्या वतीने निवेदन देत परीक्षा केंद्राची मागणी केली आहे .सदर मागणी पूर्ण न झाल्यास विद्यार्थी, पालक व नागरीकांच्या मनातील रास्त मागणी लक्षात घेऊन आंदोलन करण्याचा इशारा युवासेनेचे उपजिल्हा प्रमुख, सास्ती ग्रामपंचायत उपसरपंच कुणाल कुडे, युवासेना तालुका प्रमुख अमित( बंटी ) मालेकर , स्वप्निल मोहुर्ले, प्रविण पेटकर, वतन मादर व इतर युवासेना पदाधिकारी शिष्टमंडळाच्या वतीने निवेदनातून दिला आहे .

**चंद्रपूर :** राजुरा तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाविद्यालय कला, वाणिज्य व विज्ञान चिंचोली ( खुर्द ) हे महाविद्यालय मागील काही वर्षापासून नियमित कार्यरत आहे. या महाविद्यालयात सर्व क्षेत्रातील शिक्षण मिळणारी शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिक मिळाला आहे. या ठिकाणी शिक्षण घेणारे विद्यार्थी हे बहुतांश ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील विद्यार्थी आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र तालुक्याच्या ठिकाणी २० किमी अंतरावर असल्यामुळे खराब रस्त्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर वेळेवर जाण्यासाठी अडचणी येत असल्याने दरवर्षी अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहत आहे. यावर्षी तर राजुरा-गोवरी-कवठाळा मार्गावरील नाल्यावरचा मोठा पुलिया पाण्यात वाहून गेल्याने हा मार्गच बंद आहे अशा परिस्थितीत विद्यार्थी परीक्षा केंद्रावर जाऊ शकत नाही यामुळे ग्रामीण भागात महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र छत्रपती शिवाजी महाविद्यालय कला, वाणिज्य व विज्ञान चिंचोली ( खुर्द ) येथे देण्याची मागणी सिनेट सदस्य प्रा. निलेश बेलखेडे यांनी गोंडवाना विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ कावळे सर, परीक्षा नियंत्रण अधिकारी झाडे सर यांच्याशी चर्चा करून कुलगुरू महोदय यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी सदर विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली त्यानंतर परिक्षा केंद्र देण्यासंदर्भात परिक्षा विभागातील सर्व निकषांवर चर्चा करून सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासन यावेळी विद्यापीठामार्फत देण्यात आले. आई तुळजा भवानी महिला शिक्षण व प्रशिक्षण संस्था ज्योतीनगर द्वारा संचालित छत्रपती शिवाजी महाविद्यालय कला, वाणिज्य व विज्ञान चिंचोली ( खुर्द ) येथे ग्रामीण भागातील विद्यार्थी गावाजवळचे महाविद्यालय म्हणून पसंती दर्शवित आहे. चालू सत्रात ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. चिंचोली ( खुर्द ) हे गाव मध्यभागी असून सभोवतालच्या निमणी, पेलोरा, नांदगाव, कवठाळा, चंदनवाही, पोवणी, रामपुर, कळमणा, आर्वी, माथरा, गोवरी, साखरी अशा गावातून विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येत आहेत. तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी खराब रस्त्यामुळे वेळेवर बससेवा किंवा खाजगी वाहतूक उपलब्ध नाही. परीक्षेच्या काळात विद्यार्थाना जीव मुठीत घेऊन प्रवास करून परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा द्यावी लागत आहे. मागच्या वर्षी परीक्षेसाठी निघालेल्या दोन विद्यार्थिनींचा नाहक अपघाती मृत्यू झाला.

# गोंदिया भाजी बाजारात टमाटे २०० रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** येथील भाजी बाजारात काही दिवसांपूर्वी टोमॅटोचे दर १३० ते १५० च्या घरात असताना दोन टोमॅटो चोरीच्या घटना घडल्या होत्या. बुधवारी गोंदिया भाजी बाजारात २०० रुपये प्रतिकिलो असा दर होता. नुकतेच चार ते पाच महिन्यांपूर्वी भाव नसल्याने टोमॅटो रस्त्यावर फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. मात्र, तोच टोमॅटो आता अपेक्षेपेक्षाही अधिक ‘भाव’ खात आहे. काही दिवसांपूर्वी २० ते ३० रुपये प्रतिकिलो मिळणारा टोमॅटो आता २०० रुपयांवर पोहोचला आहे. त्यामुळे खरेदी करताना ग्राहकांना आता बराच विचार करावा लागत आहे.

# महसूल दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** 1 ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय पैठण येथे महसूल दिन साजरा करण्यात आला . यासोबत राज्य शासनाद्वारे साजरा केल्या जाणाऱ्या महसूल सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ यांनी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे उद्घाटन करून कार्यक्रमाचा कार्यक्रमाला सुरुवात झाली. याप्रसंगी तहसीलदार पैठण सारंग चव्हाण उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरात उत्साहाने भाग घेतला. कार्यालयातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून यांच्यासह 40 महिला व 30 पुरुषांची नागरिक आरोग्य तपासणी करण्यात आली . महसूल दिनाच्या आजच्या शिबिरात 38 रक्तदात्यांनी रक्तदान केले. आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाच्या वतीने रक्तातील हिमोग्लोबिन, थायरॉईड ॲनिमिया, कॅन्सर , डिटेक्शन यासह सोळा प्रकाराच्या चाचण्या करण्यात आल्या असून महसूल दिनाच्या कार्यक्रम व त्यानिमित्त युवा संवादामध्ये जिजामाता कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींची कार्यालयात भेट आयोजित करण्यात आली . तहसीलदार सारंग चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थिनींना कार्यालयाबाबत माहिती व मार्गदर्शन केले. या महसूल सप्ताहाचा भाग म्हणून " एक हात मदतीचा " यामध्ये पात्र लाभार्थ्यांना रेशन कार्ड वाटप करण्यात आले . कार्यक्रमाचा भाग म्हणून तहसील कार्यालय व श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात आधार कार्ड दुरुस्ती व अद्यावतीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. सदरील आधार केंद्रावर 150 आधार अद्यावत करण्यात आले आहे . आजच्या महसूल दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या . कार्यक्रमाचे आयोजन तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील सर्व सहकार्यांनी उत्तमरीत्या केलेल्या शुभसूचक रांगोळी व माहिती दर्शविणाऱ्या विविध विभागाच्या फलकांनी कार्यक्रम अधिकच प्रभावशाली वाटला , दिनांक 1 ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या महसूल सप्ताह 7 ऑगस्ट पर्यंत साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा असे आव्हान उपविभागीय अधिकारी वायाळ व तहसीलदार सारंग चव्हाण यांनी केले आहे.



# सर्व महापुरुषांची जयंती उत्साहात साजरी करा

## मनोज पवार : साठे जयंतीमध्ये समाज बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग


आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहर तसेच तालुक्यात विविध ठिकानी लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात पार पडली. शहरातील अण्णा भाऊ साठे चौक तहसील रोड़ येथे अण्णा भाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. या वेळी तहसिलदार विद्याचरण कडवकर, उदयोजक मनोज पवार भा.ज.पा शहराध्यक्ष सुनील पवार, शिवकुमार जैस्वाल यांच्या प्रमुख उपस्थिती जयंती साजरी करण्यात आली यावेळी महिला तसेच युतींचा मोठा सहभाग होता. यावेळी मनोज पवार बोलतानी म्हणाले प्रत्येक महापुरुषांची जयंती ही मोठ्या उत्साहात साजरी करावी, मी केव्हाही तत्पर राहील असे म्हणाले यावेळी जयंती उत्सव समिती अध्यक्ष दीपक घाडगे, उपाध्यक्ष इचके घाडगेबाई मनोज देशमुख, सोमनाथ दाभाडे, संदिप नरवडे, पवन ठाकुर, रुपेश भारूका ंची प्रमुख उपस्थिती होती.

# नांदुरा येथे अण्णा भाऊ साठे जयंती

आधुनिक केसरी न्यूज



**नांदुरा :** एक ऑगष्ट रोजी क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे मंडळाचे वतीने नांदुरा येथे साहीत्य रत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे, क्रांतीबा ज्योतीबा फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व साहीत्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन विजयी घोषणा करण्यात आल्या त्या नंतर मान्यवरांचे स्वागत होवुन अनेक मान्यवरांनी जयंती दिनी आपले मनोगत व्यक्त केली. अॅड.डी. एम भगत यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन संघर्षा विषयी मत व्यक्त करीत असतांना सांगितले की या देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे झुठे असुन आज देखिल बहुजन समाज गरिबीत असंख्य समस्येच्या गर्तेत खितपत पडलेला आहे या समाजाने जागृत होणे आवश्यक आहे त्या साठी जग बदल घालुनी घाव गेले सांगून मज भिमराव. हे आण्णाभाऊचे बोल प्रत्येकाने जिवनात उतरविणे आवश्यक आहे. विचारानेच परिवर्तन होवु शकते म्हणून मानवी मेंदुवर परिवर्तन वादी विचाराचे घाव सतत घालावेच लागतील. त्यासाठी तरुणांनी पुढे येणे काळाची गरज आहे, असे सांगितले कार्यक्रमाला अनेक महीला, पुरुष व युवा वर्ग मोठया संखेने उपस्थित होता. शेवटी आभार प्रदर्शन शुभम भाऊ यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.!

# जिंतूर येथे वृक्ष संगोपन

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** महाराष्ट्राचे वनमंत्री आर्य वैश्य समाजभूषण सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या 61व्या वाढदिवसा निमीत्त महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या आवाहना नुसार राज्यभर दि 30जुलै रोजी वृक्षा रोपण करण्यात आले त्याच अनुषंगाने जिंतूर येथे 122वृक्ष लाऊन संगोपन जबाबदारी घेण्यात आली.

जिंतूर येथे बि डी कोकडवार यांच्या परिवारातर्फे पांगरी येथील फार्म हाऊस वर 61 वां वाढदिवस असल्याने 61झाडे वृक्ष लागवड करून संगोपन करण्याची जबाबदारी घेण्यात आली तर एम आय डी सी परिसरातील वैभव ऑईल मिल येथे ही 61वृक्ष लावण्यात आले तत्पूर्वी सकाळी श्री नगरेश्वर मंदिर येथे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी अभिषेक प्रार्थना करून श्री हनुमान चालीसा पाठ संपन्न झाला.

वृक्ष संगोपन कार्यक्रमात शहरातील 75 वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते वृक्ष लावण्यात आले. या वेळी संत श्री महेश महाराज जिंतूरकर तहसीलदार राजेश सरोदे, पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे, बाजार समितीचे सभापती गंगाधरराव बोर्डीकर, मुकुंद सावजी कळमकर, समाजाचे अध्यक्ष सखाराम चिद्रवार,राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार झाड फाऊंडेशन चे अँड मनोज सारडा नगरेश्वर मंदिर चे अध्यक्ष किरण वट्टमवार मुकुंद कोकडवार, संजय कोकडवार, मंदार कोकडवार, मयूर कोकडवार, प्रणव कोकडवार. वैभव वट्टमवारसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण-पनवेल रोडवर भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :**उरण पनवेल मार्ग हा मृत्युचा सापळा बनला असून या मार्गावर अनेक लहान मोठे अपघात होत असतात. अनेक मोठया अपघातात अनेकांचे जीव गेलेले आहेत. अशाच प्रकारे एक अपघात दि 1 ऑगस्ट 2023 रोजी पनवेल तालुक्यातील गव्हाण फाटा येथे घडला आहे. या अपघातामुळे एका प्रवाशीला आपला जीव गमवावा लागला आहे.उरण पनवेल रोडवरील गव्हाण ब्रिज वर भीषण अपघात घडल्याची घटना घडली असून, यामध्ये एक प्रवासी मृत्युमुखी पडला आहे.

पनवेल वरून उरणच्या दिशेने येणाऱ्या इको गाडीला ट्रेलर ने धडक दिल्याने उरण पनवेल मार्गावरील गव्हाण ब्रिजवर भीषण अपघाता झाला. ईको गाडीमध्ये पाच प्रवासी बसले होते. यामध्ये ड्रायव्हर व इतर प्रवासी वाचले असून ड्रायव्हर सीटच्या बाजूला बसलेले तेलंगे नावाचे प्रवासी यांचा मात्र मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात झाले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. मात्र असे अपघात घडून मृत्यू होण्याची ही पहिली घटना नसून या मार्गावर वाहनांची अपघात होऊन अनेक जण मृत्यूमुखी पडले आहेत. त्यामुळे या मार्गांवर पोलिसांची कायम स्वरूपी नेमणूक करावी व आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी प्रवाशी वर्गांनी प्रशासनाकडे केली आहे.



# मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही : आ. संजय कुटे

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** सातपुड्याच्या पर्वत रांगेत ढगफुटीमुळे २२ जुलै २०२३ रोजी जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यातील झालेल्या अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीचा व नागरिकांचे जीवन पूर्वपदावर येण्यासाठी करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा बैठक घेतली.

यामध्ये आवश्यक कर्मचारी व मनुष्यबळ,बाधित घरांचे पंचनामे, शेतीचे पंचनामे, क्षतिग्रस्त रस्ते व पुल, खंडित वीज पुरवठा, पाणी पुरवठा, गावातील स्वच्छता, नागरिकांचे आरोग्य, गावातील शाळा व धरणांची स्थिती या सर्व विषयांचा आढावा या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत घेतला व अश्या संवेदनशील परिस्थितीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यानी जोमाने काम करत बाधित असलेला एकही व्यक्ती मदतीपासून वंचित राहणार याची काळजी घेण्याचे निर्देश आमदार संजय कुटे यांनी यावेळी दिले. दिनांक २७ जुलै पर्यंत जळगाव जामोद तालुक्यातील ५२१३ कुटुंबाना २ कोटी ६० लक्ष रुपये इतके अनुदान वाटप करण्यात आले, तर ३९ गावातील ५३३६ कुटुंबियांना गहू व तांदूळ प्रत्येकी १० किलो प्रमाणे वाटप करण्यात आले तसेच १६ पशुमालकांना ७.३५ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली उर्वरित पशुमालकांना मदत देण्याची कार्यवाही सुरु असून संग्रामपूर तालुक्यातील १२३६ कुटुंबाना ६१.८० लक्ष रुपये इतके अनुदान वाटप करण्यात आले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर